साप्ताहिक
# विश्वनायक
Email: vishvanayak94@gmail.com
• संपादक : बिलाल शेख •
VISHVANAYAK
Mo.8686888898

■ बीड (महाराष्ट्र) ■ साप्ताहिक ■ द्विभाषिक ■ वर्ष - ०१ ■ अंक - ३६ ■ मंगळवार दि.१ सप्टेंबर २०२६ ■ पीआरजीआय रजि.नं.- एमएचबीआयएल/२५/ए४९८० ■ किंमत २ रू. ■ पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Weekly ■ BILINGUAL ■ Year - 01 ■ Issue - 36 ■ Tuesday Dt. 1 September 2026 ■ PRGI.REG.No. MHBIL/25/A4980 ■ Price - 2 Rupees ■ Pages 4

## माजलगाव तालुक्यात सोलर प्लांटमध्ये चोरी आणि तोडफोड

**माजलगाव | प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भाटवडगाव शिवारात असलेल्या सोलर पॉवर प्लांटमध्ये अज्ञात चोरट्यांनी मध्यरात्री घुसखोरी करून लाखो रुपयांच्या केबल्स चोरून नेल्याची आणि मोठ्या प्रमाणावर साहित्याची तोडफोड केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेत सोलर प्लांटचे सुमारे ७ लाख ६४ हजार रुपयांचे नुकसान झाले असून माजलगाव ग्रामीण पोलिसांत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, परभणी येथील व्यावसायिक सतीश माणिकराव बेंबळकर यांच्या मालकीच्या 'बेंबळकर ग्रीन एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड' या सोलर प्लांटमध्ये २५ जुलै रोजी रात्री पावणेबारा वाजेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी कंपाऊंडच्या तारेवरून आत प्रवेश केला. चोरट्यांनी इन्व्हर्टरला जोडलेली सुमारे ७५ हजार रुपये किमतीची १२७३ मीटर डीसी वायर कापून चोरून नेली. याशिवाय प्लांटमधील डीसी केबल, अर्थिंग केबल, कॉपर लग्झ, एमसी फोर कनेक्टर, ट्रान्सफर मार्शलिंग बॉक्स आणि इन्व्हर्टर सेफ्टी बॉक्स या साहित्याची तोडफोड करून सुमारे ६ लाख ८९ हजार रुपयांचे अतोनात नुकसान केले.

या प्रकरणी सोलर कंपनीचे मालक सतीश बेंबळकर यांनी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस हवालदार देवकते या घटनेचा पुढील तपास करत आहेत.

# मिल्लिया शाळेत लाखोंची बोगस शिक्षक भरती ?

## एसआयटी चौकशीचे आदेश कागदावरच? बीड जिल्हा प्रशासनाची 'अर्थपूर्ण' डोळेझाक!

### ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या स्वप्नांचा लिलाव: अंबाजोगाईत नागरिकांचा संताप!

### जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घालावे; बोगस भरतीविरोधात उच्चस्तरीय चौकशीची मागणी!

### गोरगरिबांच्या स्वप्नांवर फिरवला नांगर; जिल्हा प्रशासनाकडून अर्थपूर्ण डोळेझाक?

### उच्चस्तरीय चौकशीची जिल्हाधिकाऱ्यांकडे जोरदार मागणी..

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी या गंभीर प्रकरणात तत्काळ लक्ष घालावे. अंजुमन इशात-ए-तालीम संस्थेच्या सर्व शाळांमधील शिक्षक भरतीची सखोल आणि पारदर्शक चौकशी करण्यासाठी 'उच्चस्तरीय चौकशी समिती' गठित करण्यात यावी, तसेच दोषींवर कडक कायदेशीर कारवाई करून गोरगरीब अन् पात्र तरुणांना न्याय द्यावा, अशी आक्रमक मागणी बीड जिल्ह्यातील नागरिकांकडून केली जात आहे.

**अंबाजोगाई | विश्वनायक न्युज**

मजूर, ऊसतोड कामगार आणि कष्टकरी शेतकरी स्वतःच्या पोटाला पीळ देऊन मुलांच्या शिक्षणासाठी रक्ताचे पाणी करत आहेत, या आशेने की उद्या मुलगा शिकून मोठा होईल आणि सन्मानाने नोकरी करेल. परंतु, अंबाजोगाई तालुक्यातील सदर बाजार व बारा गल्ली परिसरातील मिल्लिया प्राथमिक व माध्यमिक शाळेत गोरगरिबांच्या या विश्वासाचा अक्षरशः लिलाव मांडला गेला असल्याचा खळबळजनक आरोप नागरिकांमधून केला जात आहे.

अंजुमन इशात-ए-तालीम संस्थेने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी गुणवंत व पात्र उमेदवारांचा हक्क डावलून, आधीच सेवेत असलेल्या शिक्षकांच्याच नातेवाईकांकडून लाखों रुपयांची मोठी रक्कम उकळून ही कायमस्वरूपी बोगस शिक्षक भरती उरकल्याची जोरदार चर्चा सध्या संपूर्ण अंबाजोगाई तालुक्यात रंगली आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे स्पष्ट निर्देश असतानाही, या संस्थेंतर्गत बीड जिल्ह्यात चालणाऱ्या शाळांमधील बोगस भरतीची चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक कधी पाऊल उचलणार, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. उच्च न्यायालयाच्या आदेशाला धाब्यावर बसवून ही बोगस भरती पचवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा संताप व्यक्त होत आहे.







जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, प्राथमिक शिक्षण अधिकारी आणि माध्यमिक शिक्षण अधिकारी या संपूर्ण प्रकारावर नेमकी कधी कारवाई करणार? की या संपूर्ण प्रकरणामागे काही 'अर्थपूर्ण' व्यवहार दडले असल्यानेच अधिकारी वर्ग डोळेझाक करत आहे, अशी थेट चर्चा आता बीड जिल्ह्याच्या राजकीय व सामाजिक वर्तुळात सुरू झाली आहे.

### नातेवाईकांची वर्णी, गरिबांचा बळी: अंजुमन इशात-ए-तालीम संस्थेवर गंभीर आरोप!

१) रहेमत अली सर सेवानिवृत्त शिक्षक
२) रहेमत अली सर यांची मुलगी (शिक्षिका)
३) रहेमत अली सर यांचा जावई क्लर्क
४) रहेमत अली सर यांची सुन शिक्षिका

१) अजरा बाजी सेवानिवृत्त (शिक्षिका)
२) अजरा बाजी ह्यांचा मुलगा (शिक्षक)
३) अजरा बाजी ह्यांची सून (शिक्षिका)

१) जमील सर (मुख्याध्यापक)
२) जमील सर यांची बहिण (शिक्षिका)
३) शकील (शिक्षक) जमील सर यांचा भाऊ
४) अशरद (शिक्षक) जमील सर यांचा भाचा

१) हकीम सर (क्लर्क) सेवानिवृत्त
२) नदीम सर (शिक्षक) हकीम सर यांचा मुलगा
३) हकीम सर यांची मुलगी (शिक्षका)
४) हकीम सर यांच्या मेहण्याची पत्नी (शिक्षिका)
५) रजवी सर (शिक्षक) हकीम सर यांचा पुतण्या

१) नफिसा बाजी (शिक्षिका)
२) नफिसा बाजी ह्यांची बहिण (शिक्षिका)
३) नफिसा बाजी ह्यांचा दाजी मुख्तदीर (शिक्षक)

१) मुश्ताख सिद्दीकी (मिस्बा सर) (शिक्षक)
२) मिस्बा सर यांची पत्नी (शिक्षक)
३) मिस्बा सर यांची वहिनी अतिरीक्त (शिक्षिका)

१) मयत, मुश्ताख हुसेन सर (शिक्षक)
२) जकेरिया हुसेन (शिक्षक) मयत, मुश्ताख हुसेन यांचा मुलगा
३) मयत, मुश्ताख हुसेन यांची वहिनी सेवानिवृत्त (शिक्षिका)

१) इक्बाल दायरी सर सेवानिवृत्त (मुख्याध्यापक)
२) इक्बाल दायरी सर यांची पहिली मुलगी (शिक्षिका)
३) इक्बाल दायरी सर यांची दुसरी मुलगी (शिक्षिका)

१) मयत हुसेन अहमद अली (मुख्याध्यापक)
२) मयत हुसेन अहमद अली यांची सुन (शिक्षिका)
३) मयत हुसेन अहमद अली सरांच्या सुनाची सुन (शिक्षिका)

१) नदीम सर (शिक्षक)
२) नदीम सर यांची बहिण (से.नि.) (शिक्षका)
३) नदीम सर यांची दुसरी बहिण (शिक्षिका)

# पेठ बीड पोलिसांचा गुटखा माफीयाला दणका

## ६ लाख ४९ हजारांच्या मुद्देमालासह दोन ताब्यात; एक जण पसार

**बीड | प्रतिनिधी**

राज्य सरकारने गुटखा तसेच तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्री, वाहतूक व साठ्यावर बंदी घातलेली असतानाही बीड जिल्ह्यात गुटख्याची अवैध विक्री व वाहतूक सुरूच असल्याचे चित्र आहे. पेठ बीड पोलिसांनी शनिवारी (दि.२९ ऑगस्ट) मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे मिल्लतनगर परिसरात कारवाई करत प्रतिबंधित गुटख्याचा साठा जप्त केला. या कारवाईत सुमारे ६ लाख ४९ हजार रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला असून दोघांना पकडण्यात आले आहे. तर एक जण पसार झाला.

पेठ बीड पोलीस ठाण्याचे स.पो.नि शशिकांत व्ही. मुसळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक साईनाथ बारगळ, पोलीस कर्मचारी शहाजी बहीर, जावळे व महिला पोलीस कर्मचारी सांगळे हे शनिवारी अवैध धंद्यांविरोधात कारवाईसाठी पेट्रोलिंग करत होते. यावेळी चांदणी चौक, पेठ बीड परिसरात गोपनीय खबऱ्यामार्फत माहिती मिळाली की, मिल्लतनगर येथील सय्यद हमीद अहमद यांच्या घराजवळ पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट कारमधून काही जण गुटख्याची पोती उतरवून त्याची खरेदी-विक्री करत आहेत. माहिती मिळताच पोलिसांनी पंचांना सोबत घेऊन दुपारी सुमारे १.१५ वाजता मिल्लतनगर परिसरात धाड टाकली. त्यावेळी पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट कारमधून तीन इसम गुटख्याची पोती खाली उतरवत असल्याचे पोलिसांना दिसून आले. पोलिसांची चाहूल लागताच तिन्ही जणांनी पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी पाठलाग करून शेख समीर शेख समशोददीन (वय ३२, रा. बिलालनगर, इमामपूर रोड, पेठ बीड) आणि सय्यद वसीम सय्यद अकबर (वय ३२, रा. नागोबा गल्ली, पेठ बीड) यांना ताब्यात घेतले. तर सय्यद शाकेर सय्यद जलील (रा. महम्मदिया कॉलनी, पेठ बीड) हा पसार झाला.



पोलिसांनी स्विफ्ट कारची झडती घेतली असता त्यामध्ये प्रतिबंधित गुटख्याची पोती आढळून आली. तसेच सय्यद वसीम याच्या अंगझडतीमध्ये गुटखा खरेदी-विक्रीच्या व्यवहारातील ५ हजार ८२० रुपये रोख आढळून आले. संबंधित मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे. पोलिसांच्या प्राथमिक चौकशीत सय्यद वसीम याने सदर गुटख्याचा माल सय्यद शाकेर व शेख समीर हे दोघे स्विफ्ट कारमधून विक्रीसाठी घेऊन आले होते आणि आपण तो माल खरेदी करत असल्याची माहिती दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी अंकुश दिलीप नरवाडे यांच्या फिर्यादीवरून संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येत असून, पसार झालेल्या संशयिताचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. या कारवाईमुळे गुटखा विक्री करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

# जुगार अड्ड्यावर पथकाची धडक कारवाई

**बीड | प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात अवैध जुगार व इतर अवैध धंद्यांविरुद्ध पोलिसांकडून कारवाई सुरू असतानाच परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक भारत पांढरे यांच्या पथकाने दिंद्रुड पोलीस ठाणे हद्दीतील निथरूड शिवारात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर धडक कारवाई केली. या कारवाईत जुगार खेळणाऱ्या ९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, ४ लाख १० हजारांची रोख रक्कम, दोन चारचाकी वाहने आणि आठ मोबाईल फोन असा एकूण १४ लाख ४० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २७ ऑगस्ट रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजता माजलगाव तालुक्यातील निथरूड येथील शिवारात काही इसम जुगार खेळत असल्याची गोपनीय माहिती परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक भारत पांढरे यांना मिळाली. माहितीची खातरजमा करून त्यांच्या नेतृत्वाखालील पथकाने पंचांसमक्ष संबंधित ठिकाणी छापा टाकला.

यावेळी काही इसम गोलाकार बसून जुगार खेळताना आढळून आले. पोलिसांनी त्यांच्याकडून ४,१०,००० रोख, अंदाजे ९ लाख किमतीची दोन चारचाकी वाहने तसेच १.३० लाख किमतीचे आठ मोबाईल फोन असा एकूण १४.४० लाखांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दिंद्रुड पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम, १८८७ मधील कलम १२ (अ) अन्वये ९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि माजलगावचे उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक अनंतरे यांच्या मार्गदर्शनाखाली परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक भारत पांढरे यांच्या पथकाने केली. कारवाईत सपोनि महेश भोसले, पोलीस शिपाई अक्षय लोंढे, कृष्णा काकडे, सचिन गायकवाड, पांडुरंग मोटे, राजाभाऊ मोटे, कागणे तसेच इतर पोलीस अधिकारी व अंमलदार सहभागी होते.

# गरीब हमालांच्या जमिनी हक्कासाठी मनुर शिवारात आमरण उपोषण सुरू

**गट नं.२५ मधिल चुकीच्या फेरफाराची चौकशी करून न्याय देण्याची आंबेडकरी विचार मोर्चाची मागणी**

## तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी यांच्या अर्थपूर्ण सहकार्यामुळे गट नं.२५ मध्ये बेकायदेशीर फेरफार : सलीमबापु

**माजलगाव | प्रतिनिधी**



मनुर शिवारातील गट नं.२५ मधील सुमारे ७.५ ते ८ एकर जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर झालेल्या फेरफारांची चौकशी करून हमालांना न्याय मिळावा, या मागणीसाठी आंबेडकरी विचार मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीमबापू यांनी मंगळवार दि.१ रोजी मनुर शिवारातील गट नं.२५ येथे आमरण उपोषण सुरू केले आहे. दरम्यान तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी यांच्या अर्थपूर्ण सहकार्यामुळे गट नं.२५ मध्ये बेकायदेशीर फेरफार झाल्याचा आरोप सलीमबापु यांनी यावेळी केला आहे.

मनुर शिवारातील गट नं. २५ मधील सुमारे ७.५ ते ८ एकर जमिनीच्या मालकी हक्काचा वाद आता ऐरणीवर आला आहे. तत्कालीन अध्यक्ष मयत भुजाबा खांडेकर यांच्या नावावर खरेदीखत करण्यात आलेल्या जमिनीवर एनए लेआऊट करून सुमारे २०० ते २२५ प्लॉट हमालांना खरेदीखत करून देण्यात आहेत. मात्र, अनेक हमाल अशिक्षित असल्याने त्यांनी ग्रामपंचायत रेकॉर्डमध्ये नावे लावून पीटीआर घेतली; परंतु ७/१२ उताऱ्याच्या मालकी रकान्यात त्यांची नावे आली नाहीत. त्यानंतर भुजाबा खांडेकर यांच्या निधनानंतर त्यांच्या वारसांनी चुकीच्या पद्धतीने ७/१२ वर नावे लावून घेतली. या प्रकरणात गरीब हमालांना न्याय देण्याची वारंवार मागणी सलीम बापु यांनी प्रशासनाकडे करून दखल घेतली नाही. सदरील प्रकरणात संबंधित तलाठी, मंडळ अधिकारी आणि तहसीलदार यांच्या अर्थपूर्ण सहकार्याने फेरफार करण्यात आल्याचा आरोप करत सय्यद सलीमबापू यांनी निवेदनाद्वारे दिलेल्या इशाऱ्या प्रमाणे मनुर शिवारात उपोषण मंगळवार दि.१ रोजी सकाळी उपोषण सुरू केले आहे.

संबंधित फेरफार कोणत्या कागदपत्रांच्या आधारे करण्यात आले? हमालांकडे खरेदीखत असताना त्यांच्या नावांची मालकी हक्काच्या रकान्यात नोंद का झाली नाही? वारसांची नावे ७/१२ वर कोणत्या आधारावर दाखल करण्यात आली? गट नं.२५ ची तातडीने शासकीय मोजणी करून हद्द निश्चित करावी, पात्र हमालांच्या नावांची ७/१२ वर नोंद घ्यावी, कथित बेकायदेशीर फेरफार रद्द करावेत आणि प्रकरण निकाली निघेपर्यंत या जमिनीचे कोणतेही खरेदीखत होऊ नये, यासाठी दुय्यम निबंधकांना आदेश द्यावेत, अशा प्रमुख मागण्या सलीमबापु यांनी यावेळी लाऊन धरल्या आहेत. दरम्यान, मागण्यांची पूर्तता होईपर्यंत आमरण उपोषण सुरूच ठेवण्याचा निर्धार सय्यद सलीमबापू यांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे गट नं.२५ च्या जमिनीचा हा वाद आता प्रशासनासाठीही चांगलाच कसोटीचा ठरण्याची शक्यता आहे.

# लाच घेताना एसीबीच्या जाळ्यात; छत्रपती संभाजीनगर एसीबीची कारवाई

**बीड | प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात लाचखोरीविरोधात सातत्याने कारवाई होत असतानाही लाचखोरीचे प्रकार थांबण्याचे नाव घेत नाहीत. लातूर, छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून विविध ठिकाणी कारवाया केल्या जात असतानाच सोमवारी बीड तालुक्यात पुन्हा एक लाचखोरीचा प्रकार उघडकीस आला. नरेगा योजनेअंतर्गत शेतविहिरीच्या कामाचे बिल मंजूर करण्यासाठी ६१ हजार रुपयांची लाच मागून तडजोडीनंतर ६० हजार रुपये स्वीकारणाऱ्या ग्रामरोजगार सेवकाला छत्रपती संभाजीनगर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले.

मुकेश सोनाजी भोकरे (वय ४७), ग्रामरोजगार सहायक, रा. लिंबारुई, ता. बीड, असे कारवाई करण्यात आलेल्या कर्मचाऱ्याचे नाव आहे. एसीबीकडून मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराने नरेगा योजनेंतर्गत शेतविहिरीचे काम पूर्ण केले होते. या कामाचे बिल मंजूर करण्यासाठी भोकरे याने तक्रारदाराकडे ६१ हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. याबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर एसीबीच्या पथकाने मागणीची पडताळणी केली. त्यानंतर तडजोड होऊन ६० हजार रुपये देण्याचे निश्चित करण्यात आले. ठरल्याप्रमाणे लाचेची रक्कम स्वीकारत असताना एसीबीच्या पथकाने मुकेश भोकरे याला रंगेहाथ पकडले. या प्रकरणी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात संबंधिताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई छत्रपती संभाजीनगर एसीबीच्या अधीक्षक माधुरी कांगणे, अपर अधीक्षक शशिकांत शिंगारे आणि प्रभारी उपअधीक्षक प्रशांत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली उपअधीक्षक बाळासाहेब शिंदे, पोलीस निरीक्षक भास्कर नवले, अनवेज शेख, प्रकाश डोंगरदिवे आणि रामेश्वर ताठे यांच्या पथकाने केली.

# मंदिरात जलाभिषेक करताना विजेचा धक्का लागून तरुणाचा मृत्यू

**केज | प्रतिनिधी**

पवित्र श्रावण महिन्यात परंपरेनुसार मंदिरात देवाला गोदावरीचे जल अर्पण करण्यासाठी गेलेल्या एका २२ वर्षीय होतकरू तरुणाचा विजेचा जोरदार धक्का लागून दुर्दैवी मृत्यू झाला. ही हृदयद्रावक घटना केज तालुक्यातील जीवाचीवाडी येथील नारद स्वामी मंदिरात शुक्रवार, २८ ऑगस्ट रोजी पहाटे चार वाजेच्या सुमारास घडली. युवराज आसाराम चौरे असे मृत तरुणाचे नाव असून, या घटनेमुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे.

जीवाचीवाडी येथील नारद स्वामी मंदिरात श्रावण महिन्यात दररोज गावातील एका व्यक्तीने गोदावरी नदीचे पाणी आणून देवाला अर्पण करण्याची जुनी परंपरा आहे. याच परंपरेनुसार युवराज चौरे हे गुरुवारी रात्री दुचाकीवरून माजलगाव तालुक्यातील मोगरा शिवारात गेले होते. तेथून गोदावरीचे पवित्र जल घेऊन ते गावात परतले. शुक्रवारी पहाटे चार वाजता युवराज अत्यंत भक्तीभावाने ओल्या कपड्याने मंदिरात देवाला जलाभिषेक करण्यासाठी गेले होते. मात्र, गाभाऱ्याजवळ जमिनीवर पडलेल्या उघड्या विद्युत वायरवर त्यांचा पाय पडला आणि विजेचा तीव्र झटका बसल्याने ते जागीच कोसळले.

घटनेनंतर कुटुंबीय आणि ग्रामस्थांनी गंभीर अवस्थेतील युवराज यांना तातडीने धारूर येथील खाजगी रुग्णालयात नेले. मात्र, तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. त्यानंतर धारूरच्या शासकीय रुग्णालयात शवविच्छेदन करून दुपारी जीवाचीवाडी येथील काळअंबा वस्तीवरील शेतात शोकाकुल वातावरणात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. मयत युवराज यांच्या पश्चात आई, वडील, एक भाऊ आणि विवाहित बहीण असा परिवार असून, ऐन तारुण्यात घडलेल्या या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# चारचाकी वाहनातून ११ लाख ८० हजारांच्या रोकडसह दोघे ताब्यात

**बीड | प्रतिनिधी**

बीड शहरातील बार्शी रोड परिसरात पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे कारवाई करत एका चारचाकी वाहनातून तब्बल ११ लाख ८० हजार रुपयांची रोकड जप्त केली आहे. ही रोकड हवाला, महादेवसह अन्य ऑनलाइन गेमिंगच्या व्यवहारातील असण्याचा पोलिसांना संशय असून, या दिशेने पुढील तपास सुरू आहे.

दि.३१ ऑगस्ट रोजी दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास बार्शी रोड नाक्याहून बीड शहराकडे येणाऱ्या एमएच-४४-जी-२९२८ क्रमांकाच्या टाटा जेस्ट चारचाकी वाहनाबाबत पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सदर वाहनाचा शोध घेऊन ते थांबविले. वाहनाची झडती घेतली असता मागील सीटवर लाल रंगाची बॅग आढळून आली. या बॅगेत ११ लाख ८० हजार रुपयांची रोख रक्कम असल्याचे समोर आले. यामध्ये प्रामुख्याने ५०० आणि १०० रुपयांच्या नोटांचा समावेश आहे.

पोलिसांनी रोकड रक्कम तसेच चारचाकी वाहन असा एकूण १६ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून पंचनामा केला आहे. सदर रोकड रकमेबाबत संबंधितांकडे समाधानकारक व खात्रीलायक कागदपत्रे अथवा स्पष्टीकरण उपलब्ध नसल्याने, त्यांच्या ताब्यातील रकमेबाबत महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम १२४ अन्वये तक्रार दाखल करण्यात आली आहे.

दरम्यान, बीड जिल्ह्यात हवाला रॅकेट,महादेवसह विविध ऑनलाइन गेमिंग पच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार होत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या ऑनलाइन गेमिंगच्या आहारी अनेक तरुण जात असून, अशा पशी संबंधित मोठे नेटवर्क कार्यरत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. बेरोजगार तरुणांची बँक खाती किंवा आर्थिक व्यवहारांसाठी वापरली जात असल्याचीही चर्चा आहे. त्यामुळे जप्त करण्यात आलेल्या रकमेचा नेमका स्रोत काय आहे, ती रक्कम ऑनलाइन गेमिंगशी संबंधित, हवाला रॅकेट आहे का?, तसेच यामागे बीडमध्ये कोणते मोठे नेटवर्क कार्यरत आहे का? याचा सायबर तपासातून छडा लावण्याची गरज आहे. केज तालुक्यात सर्वाधिक वापर महादेव अँप सारख्या ऑनलाइन गेमिंग खेळवले जात असल्याने केज महादेव पचेहॉटस्पॉटबनले आहे का? असा सवाल उपस्थित होत आहे.

हवाला, महादेव प किंवा अन्य ऑनलाइन गेमिंगच्या व्यवहाराशी या रोकड रकमेचा संबंध आहे का, याबाबत पोलिसांनी सध्या केवळ संशय व्यक्त केला असून, तपासाअंतीच याबाबतचे सत्य स्पष्ट होणार आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि डीवायएसपी वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय सय्यद, पोलीस हवालदार राहुल शिंदे, पोलीस अंमलदार सानप, रणदिवे, औसरमल, ढाकणे व जगताप यांनी केली. या प्रकरणाचा पुढील तपास डीवायएसपी पथकाकडून सुरू आहे.




## पदव्यांचा डोंगर

भारतात आज पदवीधरांची संख्या विक्रमी पातळीवर पोहोचली आहे. गल्लीबोळांत महाविद्यालयांचे पेव फुटले आहे आणि वर्षागणिक लाखांच्या घरात तरुण हातात पदवी, पदविका किंवा प्रमाणपत्राची सुरकुतलेली वही घेऊन बाहेर पडत आहेत. विद्यापीठाच्या सुरक्षित वातावरणातून बाहेर पडताना त्यांच्या डोळ्यात उज्ज्वल भविष्याचे स्वप्न असते खरे पण या तथाकथित शिक्षणाचा देशाच्या श्रम बाजाराशी खरोखर काही संबंध उरला आहे का? असा प्रश्न जर विद्वानांनी स्वत:ला विचारला तर त्याचे उत्तर निश्चितच नकारात्मक असेल. नीती आयोगाचा अलीकडचा रीइमॅजिनिंग स्किलिंग फॉर विकसित भारत २०४७ हा अहवाल या प्रश्नाचे जे उत्तर देतो, ते अंगावर काटे आणणारे आहे. देशातील ८ कोटी ७० लाख तरुण ना शिक्षण घेत आहेत, ना कोणता रोजगार करत आहेत आणि ना कोणते व्यावसायिक प्रशिक्षण घेत आहेत. तसेच ८.२५ टक्के पदवीधर अशा नोकर्यांमध्ये आहेत, ज्या त्यांच्या शैक्षणिक पात्रतेशी सुसंगत आहेत. उरलेले तरुण काय करत आहेत? एकतर ते त्यांच्या शिक्षणाशी काहीही संबंध नसलेली कामे करत आहेत किंवा बेरोजगारीच्या उंबरठ्यावर खितपत पडले आहेत. हा केवळ बेरोजगारीचा प्रश्न नाही; हा आपल्या शिक्षण व्यवस्थेच्या अपुरेपणाचा, दूरदृष्टीच्या अभावाचा, धोरणशून्यतेचा आणि एकूणच ढिसाळपणाचा जळजळीत पुरावा आहे. सध्या देशात उच्च शिक्षणात ४.३४ कोटी विद्यार्थी नोंदणीकृत आहेत. एकट्या बी.ए.साठी १.१३ कोटी तरुण रांगेत आहेत, तर बी.ए., बी.कॉम. आणि बी.एस्सी. मिळून हा आकडा दोन कोटींच्या पार जातो. पण या पारंपरिक पदव्यांचे मूल्य काय? पदवी घेतली की सरकारी नोकरीची परीक्षा देता येते एवढाच एक मर्यादित दृष्टिकोन आज या पदव्यांमागे उरला आहे. नोव्हेंबर २०२४ ते जुलै २०२५ या अवघ्या आठ–नऊ महिन्यांच्या काळात केवळ ५५ हजार सरकारी जागांसाठी तब्बल १.८६ कोटी अर्ज आले, ही आकडेवारीच सांगते की तरुण किती हताश आहेत. बी.ए. अर्थशास्त्र झालेला तरुण कंपनीचे फायनान्स सांभाळू शकत नाही, बी.कॉम. झालेला मुलगा टॅली किंवा ॲडव्हान्स एक्सेल चालवू शकत नाही आणि राज्यशास्त्राचा पदवीधर साधे धोरणात्मक विश्लेषण करू शकत नाही, अशी ओरड आहे व उदाहरणेही दिली जातात. मग या कागदी पदव्यांचा खरेच उपयोग आहे का? त्यांना वर्षानुवर्षे जे शिकवले जाते आहे ते भविष्यात त्यांच्या कितपत उपयोगी पडणार आहे किंवा मुळातच त्याचा उपयोग तरी होणार आहे का, याचा कुठेही विचार होताना दिसत नाही. मध्यंतरी एक चमत्कारिक माहितीही कानावर आली. त्यानुसार मुलांचे ज्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतले जातात आणि तो अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थी बाहेर पडतात तो अभ्यासक्रमच मुलांना नोकरीसाठी तयार करत नाही; आणि उद्योजक बनण्यासाठी तर अजिबातच नाही अशी स्पष्टोक्तीच ऑफ द रेकॉर्ड देण्यात आली. याचा अर्थ तुम्ही प्रवेश घ्या, फी भरा आणि पदवीचे बेंडोळे तेवढे शिक्षण संस्थांकडून घ्या, त्याचा नोकरीच्या अथवा उद्योगाच्या बाजारात काही उपयोग होईल याची कोणतीही हमी व जबाबदारी या संस्थांची नाही आणि अभ्यासक्रम तयार करणार्यांची तर नाहीच नाही. नोकरी–उद्योगाचे ज्याने त्याने आपापल्या पात्रतेवर आणि वकुबावार पाहावे. नीती आयोगाच्या अहवालानुसार ८० टक्के विद्यार्थ्यांनी मान्य केले आहे की, त्यांच्या अभ्यासक्रमात प्रत्यक्ष कामाचा अनुभव आणि उद्योगांशी संपर्क नावालाही नव्हता. ३४ टक्के तरुणांना कौशल्यांची कमतरता जाणवते, तर १८ टक्क्यांना साधी मुलाखत कशी द्यावी हेही माहीत नसते. कॉलेजच्या चार भिंतींत पुस्तकांचा रट्टा मारून मिळालेली पदवी म्हणजे रोजगाराची गॅरंटी ही कल्पनाच आता पूर्णपणे लयाला गेली आहे. उद्योगजगताची गरज वेगळी आहे आणि आपल्या विद्यापीठांचे जुनाट अभ्यासक्रम वेगळ्याच जगात वावरत आहेत. आजच्या डिजिटल आणि तंत्रज्ञानाच्या युगातही आपण २०–२५ वर्षे जुनाट विषय विद्यार्थ्यांना शिकवत आहोत. प्राध्यापकांना स्वतःला उद्योगांचा कोणताही अनुभव नसतो, तर महाविद्यालयांकडे आधुनिक प्रयोगशाळा किंवा पायाभूत सुविधा नाहीत. संशोधनाच्या नावाने आनंदी आनंदच आहे. केवळ आणखी महाविद्यालये काढणे किंवा पदव्या वाटणे हा यावरचा उपाय नक्कीच नाही. नीती आयोगाने जो रोडमॅप मांडला आहे, त्याची तातडीने आणि कठोर अंमलबजावणी करणे ही काळाची गरज आहे. उच्च शिक्षणाला थेट उद्योगांशी जोडावे लागेल. उद्योगांच्या गरजेनुसार अभ्यासक्रम दरवर्षी अपडेट झाले पाहिजेत. महाविद्यालयांमध्ये केवळ पुस्तकीज्ञान न देता प्रत्यक्ष उद्योगांच्या सहकार्याने प्रयोगशाळा आणि लाइव्ह प्रोजेक्ट्स सुरू केले पाहिजेत. प्रत्येक पदवी अभ्यासक्रमात किमान ६ महिने ते १ वर्षाची प्रत्यक्ष कामाची सक्ती केली पाहिजे. केवळ कागदी प्रमाणपत्र चालणार नाही; विद्यार्थ्याला प्रत्यक्ष काम करता आले पाहिजे. शिक्षण संस्थांना आधुनिक रूप देऊन तरुण पिढीला विशिष्ट कौशल्यांमध्ये पारंगत केले पाहिजे. भारताकडे सध्या जगातील सर्वाधिक तरुण लोकसंख्या आहे. पण जर या जनसांख्यिकीय लाभांशाचे ज्याला डेमोग्राफिक डिव्हिडंड म्हणतात त्याचे आपण वेळेत कौशल्यांमध्ये रूपांतर केले नाही, तर त्याचे रूपांतर एका महाभयंकर सामाजिक आणि आर्थिक आपत्तीत अर्थात डेमोग्राफिक डिझास्टरमध्ये व्हायला वेळ लागणार नाही. आता केवळ पदव्या वाटण्याची वेळ उरलेली नाही, तर हाताला कौशल्य आणि मेंदूला व्यावहारिक ज्ञान देण्याची वेळ आहे. शिक्षण व्यवस्थेची ही मोडकळीस आलेली इमारत आपण वेळीच दुरुस्त करायला हवी. नाही तर 'विकसित भारत २०४७' हे केवळ एक स्वप्नच राहून जाईल!

# पोकळे वस्तीवरील जि.प. शाळा जीर्णावस्थेत; विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

### छताचे खपले कोसळत असल्याने विद्यार्थी-शिक्षक जीव मुठीत घेऊन ज्ञानार्जन; स्ट्रक्चर ऑडिट करून पुनर्बांधणीसाठी निधी द्या : डॉ.ढवळे

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील पिंपळा केंद्रांतर्गत लोणी सय्यदमिर येथील पोकळे वस्तीवरील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची इमारत जीर्णावस्थेत असून छताचे खपले कोसळून विद्यार्थ्यांच्या अंगावर पडत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. त्यामुळे शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, जीव मुठीत घेऊन ज्ञानार्जन करण्याची वेळ विद्यार्थ्यांवर आली आहे.

या शाळेचे तातडीने 'स्ट्रक्चर ऑडिट' करून धोकादायक इमारतीची पुनर्बांधणी करण्यात यावी तसेच नवीन वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी जिल्हा वार्षिक नियोजन निधीतून आवश्यक तरतूद करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य, डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रेहमान यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.



**'स्कूल ठीक करो' अभियानातील पाहणीवर प्रश्नचिन्ह**

'स्कूल ठीक करो' अभियानाच्या माध्यमातून जिल्ह्यातील शाळांच्या दुरावस्थेची पाहणी करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करणारे आष्टीचे गटशिक्षणाधिकारी आणि शाळांच्या पाहणीसाठी परवानगी घेण्याच्या सूचना देणारे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रेहमान आता या धोकादायक शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी काय पाऊल उचलणार? नवीन वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी तातडीने निधी उपलब्ध करून देणार का? असा सवाल डॉ. गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

**१९९८ साली बांधलेली इमारत जीर्ण**

लोणी सय्यदमिर येथील पोकळे वस्तीवरील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पहिली ते चौथीपर्यंतचे वर्ग असून एकूण २६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शाळेची इमारत सन १९९८ मध्ये षटकोनी आकारात बांधण्यात आली होती.मात्र, सध्या इमारतीची अवस्था अत्यंत खराब झाली असून छताचे खपले कोसळत आहेत. शाळेच्या इमारतीच्या दुरवस्थेबाबत दरवर्षी वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती देऊन पाठपुरावा करण्यात येत असल्याचे शाळेचे मुख्याध्यापक दत्ता मामा शिंदे यांनी डॉ. गणेश ढवळे यांच्याशी बोलताना सांगितले.

**विद्यार्थ्यांच्या जीविताशी खेळ नको**

जीर्ण इमारतीत विद्यार्थ्यांना बसवून शिक्षण देणे धोकादायक ठरू शकते. एखादी दुर्घटना घडल्यानंतर प्रशासन जागे होण्यापेक्षा तातडीने स्ट्रक्चर ऑडिट करून सुरक्षित वर्गखोल्या उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देऊन जिल्हा प्रशासन आणि जिल्हा परिषद प्रशासनाने तातडीने निधी मंजूर करावा, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.

## महसूल प्रशासनाच्या चिरीमिरीने हमालांच्या जमिनीवर वारसांचा डोळा

### तहसीलदार रूईकर यांच्या भूमिकेवर संताप!; गट नं.२५ मधील कथित फेरफारांच्या चौकशीची मागणी

### कारवाई न झाल्यास १ सप्टेंबरला मनुरमध्ये आमरण उपोषण करणार : सय्यद सलीमबापु

**माजलगाव । प्रतिनिधी**

गरीब हमाल–मापाडी कामगारांनी कष्टाची कमाई एकत्र करून घेतलेल्या मनुर शिवारातील गट नं. २५ मधील सुमारे ७.५ ते ८ एकर जमिनीच्या मालकीचा वाद आता चिघळला आहे. या जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर झालेल्या कथित फेरफारांवरून तहसील प्रशासनाच्या कारभारावरच गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. आंबेडकरी विचार मोर्चा व आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीम (बापू) यांनी तहसीलदारांना निवेदन देत या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने तातडीने दखल घेतली नाही, तर १ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता मनुर शिवारातील गट नं.२५ येथे आमरण उपोषण करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.



निवेदनातील माहितीनुसार, संबंधित जमीन हमाल–मापाडी कामगारांनी वर्गणी जमा करून तसेच बाजार समितीच्या आर्थिक मदतीतून घेतली होती. तत्कालीन अध्यक्ष मयत भुजाबा खांडेकर यांच्या नावावर खरेदीखत करण्यात आले. त्यानंतर खांडेकर यांनी या जमिनीवर एन.ए.लेआऊट करून सुमारे २०० ते २२५ प्लॉट हमालांना खरेदीखत करून दिला आहे. मात्र, अशिक्षित व निरक्षर असल्याने अनेक हमालांनी ग्रामपंचायत रेकॉर्डमध्ये नावे लावून पी.टी.आर. घेतली; ७/१२ च्या मालकी रकान्यात मात्र त्यांची नावे आली नाहीत. याच त्रुटीचा फायदा घेत खांडेकर यांच्या निधनानंतर त्यांच्या वारसांनी ७/१२ वर स्वतःची नावे लावून घेतली आहे. या सर्व प्रकारात महसूल यंत्रणेतील तलाठी, मंडळ अधिकारी आणि तहसीलदारांनी चिरीमिरी घेऊन प्रकरण दाबले आहे. संबंधित फेरफार नेमक्या कोणत्या कागदपत्रांच्या आधारे झाले? हमालांकडे खरेदीखत असताना त्यांच्या मालकीची नोंद का झाली नाही? आणि वारसांची नावे कशाच्या आधारे ७/१२ वर आली? या प्रश्नांची उत्तरे तहसील प्रशासनाने द्यावीत, अशी मागणी सलीम बापू यांनी केली आहे.

त्याचप्रमाणे संबंधित जमिनीची तातडीने शासकीय मोजणी करून हद्द निश्चित करावी, हमालांच्या नावांची ७/१२ वर नोंद घ्यावी, कथित बेकायदेशीर फेरफार रद्द करावेत आणि गट नं.२५ संदर्भात कोणतेही खरेदीखत होऊ नये, यासाठी दुय्यम निबंधकांना आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. गरीब हमालांच्या हक्काचा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवून महसूल प्रशासन नेमके कोणाची बाजू घेत आहे? असा संतप्त सवाल उपस्थित करत प्रशासनाने निवेदनाची दखल घेऊन कागदपत्रांची निष्पक्ष चौकशी न केल्यास १ सप्टेंबर रोजी आमरण उपोषण करण्याचा इशारा सय्यद सलीमबापू यांनी दिला आहे.

## सतीशचा संघर्ष पुनर्वसनला शैक्षणिक दिशा देईल : दत्ता कांबळे

**माजलगाव / शेख अखिल**

ब्रम्हगाव येथील श्री सतीश महादेव कांबळे यांची पवित्र पोर्टल मार्फत होणाऱ्या शिक्षक भरतीमध्ये प्राथमिक शिक्षक म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचा व वडील महादेव कांबळे व आई सागरबाई, छोटा बंधू सचिन कांबळे सह कुटुंबीयांचा पुनर्वसन सदस्य तथा काँग्रेसचे अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांच्या वतीने कौटुंबिक सत्कार करण्यात आला.



यावेळी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे पुनर्वसन तथा काँग्रेस नेते दत्ता कांबळे यांनी म्हटले की, सतीशने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतले आहे. पुनर्वसनसारख्या भागात जिथे आजही अनेक समस्या आहेत, तिथे सतीशने मिळवलेले यश हे इतर तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. सतीशचा हा शैक्षणिक संघर्ष निश्चितच संपूर्ण पुनर्वसनला नवी शैक्षणिक दिशा देईल आणि इथे शैक्षणिक चळवळीला अधिक गती येईल.

सतीशच्या या यशामुळे पुनर्वसनमधील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल नवा उत्साह निर्माण झाला असून त्याच्या कुटुंबाचे सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे, ब्रम्हगाव येथील वरिष्ठ मार्गदर्शक अशोक कांबळे,जेष्ठ मार्गदर्शक अशोक शिंदे,प्रा. सुनील कांबळे सर, प्रा. सुधाकर कांबळे सर यांच्या सह प्रतिष्ठित नागरिक, सामाजिक कार्यकर्ते समाज बांधव उपस्थित होते.

## माजलगाव तालुक्यातील वाळूघाट बंद असतानाही शहरात भरदिवसा वाळूची वाहतूक सुरु असल्याचा प्रकार समोर आलाय!

**माजलगाव । शेख अखिल**

दि.२० ऑक्टोंबर २०२६ रोजी माजलगावच्या संभाजी महाराज चौकाजवळ एका कॉम्प्लेक्सच्या बांधकामासाठी भरदिवसा वाळूचा टिप्पर येतो आणि वाळू खाली केली जाते. विशेष म्हणजे, वाळू खाली होत असतानाच माजलगाव तहसील चे महसूल विभागाची अधिकारी यांची गाडीही घटनास्थळी पोहोचते.

यानंतर एका युवकाची अधिकाऱ्यांसोबत जवळपास दोन मिनिटे चर्चा होते आणि त्यानंतर वाळू भरलेले टिप्पर खाली करण्याचे काम सुरू होते.



आता थेट साप्ताहिक विश्वनायक चा सवाल

वाळूघाट बंद असताना ही वाळू आली कुठून?

या वाळूच्या वाहतुकीची परवानगी होती का?

अधिकृत साठा असेल तर त्याची कागदपत्रे कुठे आहेत?

आणि सर्वात महत्त्वाचा प्रश्न

अवैध वाळू वाहतूक पकडण्याची जबाबदारी महसूल विभागाची की पत्रकारांची?

साप्ताहिक विश्वनायक याबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता, संबंधित अधिकाऱ्यांनी, तुम्ही त्या वाळूवाल्याकडे जा आणि सांगा की मी पाठवलंय बघा तो भीतीने कापतो की नाही, अशा आशयाचे वक्तव्य केल्याचे सांगण्यात येत आहे.

तसेच, पुन्हा वाळू आणताना जर तो दिसला तर तुम्ही तो टिप्पर पकडा, अशी आशयाची भूमिका महसुल अधिकाऱ्यांकडून व्यक्त झाल्याचा दावा आहे. या संपूर्ण प्रकरणाचा व्हिडिओ पुरावा साप्ताहिक विश्वनायक हाती येणार असून, तो व्हिडिओ व संबंधित अधिकाऱ्यांशी झालेल्या संवादाचा व्हिडिओ पुढील भागात पुराव्यासह समोर आणला जाणार आहे.

ही वाळू नेमकी कुठून आली आणि या वाहतुकीला वाळू घाट चालू नसतानाही परवानगी कोणी दिली संबंधित महसूल अधिकारी टिप्पर रिकामा होत असताना असतानाही तो वाळूच्या टिप्पर वर अधिकाऱ्यांनी कारवाई का केली नाही. याचे उत्तर आता प्रशासनाला द्यावेच लागणार आहे.

## लिंबागणेश येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सवानिमित्त संगीतमय भागवतकथा सप्ताहास प्रारंभ

### पोहीचा देव संस्थानचे महंत रंगनाथभाऊ वायंदेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण; पंचक्रोशीतील महानुभाव भाविकांची उपस्थिती

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी सार्वजनिक महोत्सवानिमित्त आयोजित संगीतमय श्रीमद् भागवत कथा सप्ताहाच्या (दशम स्कंध) सोहळ्यास आज शनिवार, दि. २९ रोजी उत्साहात प्रारंभ झाला. पोहीचा देव संस्थानचे महंत रंगनाथभाऊ वायंदेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. धार्मिक विधीनुसार श्रीदत्तात्रेय व लक्ष्मीनारायणाची पूजा करण्यात आली. यावेळी चौरंगावर पांढरे वस्त्र अंथरून त्यावर दत्तात्रेय महाराजांच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली. धूप, दीप, फुले व नैवेद्य अर्पण करून आरती करण्यात आली.



सप्ताहभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी पारायण, दुपारी उटी–उपहार, सायंकाळी आरती व प्रवचन, तर रात्री संगीतमय भागवतकथेचे आयोजन करण्यात आले आहे. श्रीक्षेत्र पांचाळेश्वर, ता. गेवराई, जि. बीड येथील भागवताचार्य प.पू. महंत श्री ओंकार व्यास बाबा शास्त्री महानुभव यांचे प्रवचन या सप्ताहात होणार आहे. दि.५ सप्टेंबर रोजी काल्याच्या किर्तनाने भागवतकथा सप्ताहाची सांगता होणार आहे. या धार्मिक सोहळ्यास पोहीचा देव संस्थानचे महंत रंगनाथभाऊ वायंदेकर, महंत विश्वनाथ बाबा यांच्यासह पंचक्रोशीतील महानुभाव भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

धार्मिक सोहळ्याच्या आयोजनासाठी मंदिराचे पुजारी विजय पाटोदेकर, राजेभाऊ आप्पा गिरे, अनंतकाका मुळे, बालासाहेब जाधव, कल्याण बापू वाणी, सुंदरनाना जाधव, बाळुकाका थोरात, बाळकृष्ण मुळे, विक्रांत वाणी, गणपत तागड, भगवान मोरे, गोवर्धन गिरे, रंजित भोसले, रामकिसन गिरे, विनायक वाणी, शंकर वाणी, दादा गायकवाड, संजय घोलप, लहु जाधव, संदीप मुळे, छबु मांगलकर, रामदास मुळे, अर्जुन घोलप, गणेश लिंबेकर, संतोष भोसले, सुदाम रणखांब, जय गिरे, भालचंद्र गिरे, तुळशीराम वनवे, विठ्ठल कदम, दशरथ दाभाडे, अर्जुन गिरे आदींनी उपस्थिती होती.

## साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती अंथरवन पिंपरी येथे विविध उपक्रमाने साजरी

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय समाज अनेक अनिष्ट रूढी परंपरा आणि उच–नीच भावनेत अडकलेला आहे. बहुसंख्य समाज शिक्षणापासून कोसोमाईल दूर होता. बहुजनांच्या दुर्दशेचे कारण अविद्या आहे हे क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले यांनी ओळखून दीनदलित व अस्पृश्यां व स्त्रियांच्या शिक्षणाची दारे खुली करून विद्या म्हणजे सत्यजाणने व विवेक जागृत करणे होय हे ओळखले होते. म्हणून विवेक जागृत झालेला समाज निर्माण व्हायचा असेल व जगात जर शांतता हवी असेल तर तथागतांनी सांगितलेले चार आर्य सत्य, पंचशील, आर्य अष्टांगिक मार्ग व १० पार्मिताचे पालन करणे आणि भारतातील रयतेचे राजे कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज, आरक्षणाचे जनक छत्रपती शाहू महाराज, क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले, राष्ट्रमाता जिजाऊ, क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले, पुण्यश्लोक अहिल्या महाराणी होळकर, संत कबीर, संत रविदास, व महात्मा बसवेश्वर, बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड यांचे जयंती दिन सार्वजनिक रित्या सर्व समाजातील लोकांनी एकत्र येऊन महापुरुषांच्या जीवनकार्याचे सखोल वाचन, चिंतन व मनन करून एकोपा निर्माण करून मानव कल्याणाकरता त्यांनी दाखवून दिलेले कार्य आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो हा विवेक जागृत ठेवून कार्य केले तरच महापुरुषांची जयंती आपण चांगल्या प्रकारे साजरी केली असे समजले जाईल. असे प्रतिपादन प्रशांत वासनिक यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले.




मौजे अंथरवन पिंपरी येथे माजी सरपंच बबनराव वाघमारे यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती गावातील सर्वांना एकत्र आणून विविध उपक्रमाने साजरी केली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी सरपंच जालिंदर शिंदे लाभले होते तर विचार मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून प्रशांत वासनिक, महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम. भोले, सेवानिवृत्त सीईओ पी व्ही बनसोडे यांची उपस्थिती होती. वाचाल तर वाचालचे अध्यक्ष डी.जी. वानखेडे, अनुसूचित जाती भाजप युवा मोर्चा प्रदेशउपाध्यक्ष अनिल चांदणे, सेवानिवृत्त शिक्षक राम चांदणे, अँड.तेजस वडमारे, डी.एम. राऊत, पिंपरीकर भास्करराव, व वाठोरे यांची विचार मंचावर उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक, आयोजक माजी सरपंच बबनराव वाघमारे यांनी करून आपल्या प्रस्ताविकात जयंती उत्सवात आपल्या विचाराची देवान–घेवान व महापुरुषांचे विचार खेड्यापाड्यात पोहोचवणे किती गरजेचे आहे हे स्पष्ट केले.

सर्व महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्प व पुष्पमाला मान्यवरांच्या हस्ते अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे आयोजक वाघमारे यांनी ३० विद्यार्थ्यांना महापुरुषाची जीवन चरित्र पुस्तके भेट दिली. तर विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लहानपणीच लागावी म्हणून वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालय गेल्या दहा वर्षापासून प्रयत्न करीत आहे. ह्या वाचनालयाच्या ४५ व्या केंद्राचा शुभारंभ कार्यक्रमाच्या अध्यक्षांच्या व मान्यवरांच्या हस्ते अंथरवन पिंपरी करिता ५१ पुस्तकांचा संच विद्यार्थी व पालकांना वाचण्याकरिता अध्यक्ष डी.जी. वानखेडे यांनी बबन वाघमारे यांना सुपूर्द केला. या सर्व पुस्तकांचा विद्यार्थी व पालकांनी लाभ घ्यावा असे नम्र आवाहन वाचनाला तर्फे करण्यात आले. ०३ महिन्यानंतर पुन्हा ५० ते ६० नवीन पुस्तकांचा संच वितरित करण्यात येईल असे स्पष्ट केले. उपस्थितांना आपले मनोगत व्यक्त करताना महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम. भोले यांनी स्पष्ट केले की पुढे गेलेल्यांनी मागे राहिलेल्यांकरिता आपण समाजाचे काहीतरी देने लागतो या भावनेतून महापुरुषांनी सांगितलेली समाज उपयोगी कार्यक्रम महामानव अभिवादन ग्रुप राबवत असलेल्या व समाज कार्याबद्दल माहिती देऊ सर्वच परिवर्तनवादी महापुरुषांचे जीवन कार्य खेडोपाडी कसे पोहोचवता येईल हे अशा उपक्रमातून कसे शक्य आहे हे सविस्तर सांगितले

याप्रसंगी माननीय अनिल चांदने, ग्राम विकास अधिकारी ज्योती लेकुरूवाळे, राम चांदणे, ग्रामपंचायत सदस्य शिंदे, व भैय्या वैराळे यांनी साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या लेखन साहित्य बद्दल व कष्टकऱ्यांच्या सामाजिक उद्धाराकरिता केलेल्या कार्याबद्दल सखोल प्रकाश टाकला. ङ्कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन माननीय भैया वराळे यांनी केले कार्यक्रमास सेवानिवृत्त पीएसआय सुनील वाघमारे, सेवानिवृत्त पीएसआय कांबळे बीड, एलआयसी प्र अधिकारी सोनवणे, पुरुष व महिला बहुसंख्य विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता जयंती अध्यक्ष आकाश वाघमारे, सचिव संग्राम वाघमारे, बाजीराव वाघमारे, गौतम कांबळे, स्वाती बबन वाघमारे, कमल रघुनाथ वाघमारे, यांनी बहुमोल परिश्रम घेतले. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे व सर्वच महापुरुषांच्या जीवनावर प्रबोधनात्मक गीतांचा संगीत रजनी कार्यक्रम सुप्रसिद्ध गायक आकाश जाधव, अस्मिता अहिरे, शेख सहाब, श्याम माने यांच्या संचांनी सादर करून कार्यक्रमाची सांगता झाली.

# बीड जिल्ह्यामध्ये पावसाने ओढ दिली; शेतकरी संकटात!

## नद्या-नाले, तलाव, बंधारे कोरडे; खरीप पिके करपली, चाऱ्याचाही प्रश्न गंभीर; सरकारने पंचनाम्याच्या फेऱ्यात न अडकवता हेक्टरी एक लाखांची मदत द्यावी : बाजीराव ढाकणे

**बीड । प्रतिनिधी**

पावसाळ्याचे तीन महिने उलटून गेले, तरी बीड जिल्ह्यात पावसाने अपेक्षित हजेरी न लावल्याने ग्रामीण भागावर गंभीर संकट ओढवले आहे. नदी, नाले, ओढे, तलाव आणि बंधारे कोरडे पडले असून अनेक गावांतील विहिरी व बोअरवेलची पाणीपातळीही चिंताजनक झाली आहे. पावसाअभावी खरीप पिके करपून गेल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. पिकांबरोबरच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही दिवसेंदिवस गंभीर होत आहे असे महा एनजिओ फेडरेशन चे बीड जिल्हा समन्वयक श्री बाजीराव ढाकणे यांनी म्हटले आहे. एकीकडे शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसला आहे, तर दुसरीकडे सरकारी यंत्रणा मात्र अद्याप अपेक्षित गांभीर्याने मैदानात उतरलेली दिसत नसल्याची तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

**पेरणी केली; मात्र पाऊस नाही**

खरीप हंगामाच्या सुरुवातीला झालेल्या पावसाच्या भरवशावर शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात पेरणी केली. बियाणे, खते, औषधे, मशागत आणि मजुरीवर हजारो रुपये खर्च केले. मात्र पिकांच्या वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर पावसाने पाठ फिरवल्याने अनेक भागांतील पिकांची अवस्था दयनीय झाली आहे. सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद यांसह विविध पिकांवर पावसाच्या खंडाचा परिणाम झाला असून अनेक शेतांमध्ये उभी पिके करपून गेल्याचे चित्र आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर पीक वाचवायचे कसे आणि कुटुंब चालवायचे कसे? असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

**जलस्त्रोतांमध्ये ठणठणाट**

पावसाळ्यात पाण्याने भरून जाणारे स्थानिक नदी-नाले, ओढे, तलाव आणि बंधारे यंदा अनेक ठिकाणी कोरडेच आहेत. जलसाठे निर्माण न झाल्याने भूजल पुनर्भरणालाही फटका बसला आहे. परिणामी विहिरी आणि बोअरवेलच्या पाणीपातळीत घट होत असून आगामी काळातील पाणीटंचाईची चाहूल आतापासूनच लागली आहे असे महा एनजिओ फेडरेशन चे बाजीराव ढाकणे यांनी सांगितले आहे. ही परिस्थिती केवळ शेतीपुरती मर्यादित नसून भविष्यात पिण्याचे पाणी आणि पशुधनाच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



**पिके गेली; आता जनावरे कशी जगवायची?**

पावसाअभावी पिकांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर मोठा परिणाम झाला आहे. त्यातच शेतातील हिरवा चारा उपलब्ध होत नसल्याने पशुपालकांसमोर जनावरे जगविण्याचे आव्हान उभे राहिले आहे. चारा महागल्यास त्याचा अतिरिक्त आर्थिक भार शेतकऱ्यांवर पडणार आहे. त्यामुळे शासनाने पीक नुकसानीबरोबरच पशुधनासाठी चारा व पाण्याची स्वतंत्र व्यवस्था करावी, अशी मागणी महा एनजिओ फेडरेशन चे बाजीराव ढाकणे यांनी केली आहे.

**सरकारने बघ्याची भूमिका सोडावी**

शेतकरी अभूतपूर्व संकटात सापडलेला असताना राज्य आणि केंद्र सरकारने केवळ परिस्थिती पाहत न बसता तातडीने मदतीसाठी पुढे आले पाहिजे, अशी मागणी महा एनजीओ फेडरेशनचे बीड जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे यांनी केली आहे. शेतकऱ्यांनी कर्ज काढून, उधारी करून पिकांमध्ये पैसा टाकला. आता पाऊस नसल्याने संपूर्ण हंगाम हातातून जाण्याची वेळ आली आहे. शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर पिके करपून जात असताना शासनाने केवळ कागदोपत्री अहवालांची वाट पाहू नये. अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन परिस्थिती पाहावी, अशी मागणी बाजीराव ढाकणे यांनी केली.

**हेक्टरी एक लाखांची तातडीची मदत द्या**

पावसाअभावी नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाने तातडीने हेक्टरी किमान एक लाख रुपये आर्थिक मदत द्यावी, अशी ठाम मागणी बाजीराव ढाकणे यांनी केली आहे. बाजीराव ढाकणे यांच्या प्रमुख मागण्या १. पावसाअभावी झालेल्या पीक नुकसानीचे तातडीने सर्वेक्षण व पंचनामे करावेत. २. बीड जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना हेक्टरी किमान एक लाख रुपये तातडीने मदत द्यावी. ३. जनावरांसाठी तातडीने चारा व पाण्याची व्यवस्था करावी. ४. संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन गावनिहाय पाणीटंचाई कृती आराखडा तयार करावा. ५. शेतकऱ्यांना कर्ज, वीजबिल व इतर आर्थिक दायित्वांमध्ये तातडीचा दिलासा द्यावा. ६. जिल्ह्यातील नदी, नाले, ओढे, तलाव आणि बंधाऱ्यांच्या जलसाठ्याची तातडीने पाहणी करून आवश्यक जलव्यवस्थापन उपाययोजना कराव्यात.

**आता घोषणा नको; थेट मदत हवी!**

दरवर्षी पावसाच्या अनिश्चिततेमुळे बीड जिल्ह्यातील शेतकरी संकटाला सामोरा जात आहे. मात्र संकटाच्या काळात पंचनामे, अहवाल आणि प्रशासकीय प्रक्रियेत मदत अडकून पडू नये. शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट मदत कधी जमा होणार, हाच आता खरा प्रश्न आहे. शेतकऱ्यांची परिस्थिती आणखी बिकट होण्यापूर्वी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा. शेतकरी जगला तरच शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्था जगेल, याची जाणीव ठेवून राज्य सरकार आणि केंद्र सरकारने बीड जिल्ह्याकडे विशेष लक्ष द्यावे, अशी मागणी बाजीराव ढाकणे यांनी केली आहे.

---

# बीड जिल्ह्याला दत्तक घेऊन २५,००० कोटींचे बुंदेलखंड धर्तीवर विशेष पॅकेज द्या : अनिल बोर्डे

### कृष्णा नदी व कोकणचे पाणी बीडकडे वळवा; पंतप्रधान व मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**गेवराई । प्रतिनिधी**

बीड जिल्हा हा महाराष्ट्रातील सर्वात मागास व दुष्काळी जिल्हा म्हणून ओळखला जातो. १९७४ साली मराठवाडा विकास आंदोलन झाले, तरीही ५२ वर्षांनंतरही बीड जिल्हा विकासापासून वंचितच आहे, अशी खंत व्यक्त करत श्री जगदंबा ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष व मराठवाडा विकास आंदोलक अनिल बोर्डे यांनी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी व मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे विशेष आर्थिक पॅकेजची मागणी केली आहे. अनिल बोर्डे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आपल्याच कार्यकाळात बीडच्या रेल्वे प्रकल्पाला गती मिळाली आहे व बीडमध्ये आपले भाषण ऐकण्याचा योग आला. आता बीडचा कायमचा दुष्काळ संपवण्यासाठी ठोस पाऊल उचलणे आवश्यक आहे. त्याशिवाय बीडचा विकास होणार नाही.

दुष्काळ व शेतकरी आत्महत्या जिल्ह्यात सिंचनाची सोय नसल्याने दरवर्षी दुष्काळ पडतो. कर्जबाजारीपणामुळे शेतकरी आत्महत्या वाढल्या आहेत. कोकणात वाहून जाणारे पाणी बीडकडे वळवले तरच हा प्रश्न सुटेल. बेरोजगारी व गुन्हेगारी: जिल्ह्यात एकही मोठी चखऊ, खढ पार्क किंवा मोठा कारखाना नाही. त्यामुळे लाखो तरुण पुणे-मुंबईकडे स्थलांतर करतात आणि रिकाम्या हातामुळे गुन्हेगारी वाढत आहे. रेल्वे: परळी-बीड-अहिल्यानगर आणि धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर या दोन्ही रेल्वे मार्गाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करून बीडला नियमित रेल्वे सुरू करणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षण व आरोग्य: जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय, अभियांत्रिकी कॉलेज व अद्ययावत रुग्णालये नाहीत. उपचारासाठी रुग्णांना संभाजीनगरला जावे लागते.



२५,००० कोटींचे विशेष पॅकेज: बारामती पॅटर्नवर किंवा केंद्राच्या बुंदेलखंड पॅकेजच्या धर्तीवर दुष्काळ निवारण, रस्ते, पाणी व रेल्वेसाठी विशेष पॅकेज जाहीर करावे. पैठणचे पाणी व नदी जोड प्रकल्प: जायकवाडी धरणातून बीडसाठी हक्काचे पाणी द्यावे. तसेच कृष्णा नदीचे पाणी, कोकणातील वाहून जाणारे पाणी बीडकडे वळवण्याची योजना व नदी जोड प्रकल्प तात्काळ मंजूर करावा. औद्योगिक पॅकेज: गेवराई, बीड, परळी, पाटोदा, माजलगाव येथे नवीन चखऊ स्थापन करून उद्योगधंदे आणावेत, जेणेकरून तरुणांना जिल्ह्यातच नोकऱ्या मिळतील. शैक्षणिक व वैद्यकीय हब: गेवराई येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अभियांत्रिकी महाविद्यालय व स्कील डेव्हलपमेंट सेंटर सुरू करावे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, कै. अजितदादा पवार यांनी बीडला बारामती प्रमाणे करू असे आश्वासन दिले होते. त्यांच्या आश्वासनाची पूर्तता करण्यासाठी व त्यांना खरी भावपूर्ण श्रद्धांजली देण्यासाठी बीड व गेवराई तालुक्याला शासनाने दत्तक घेऊन विकासाच्या मुख्य प्रवाहात आणावे, अशी आर्त हाक जिल्ह्यातील गरीब, शेतकरी, कष्टकरी जनतेतून मन की बातद्वारे करण्यात येत आहे. या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन व उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री श्रीमती सुनेत्राताई पवार यांना देण्यात आल्या असून त्यांनी युद्धपातळीवर प्रयत्न करावेत अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

---

# शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांसाठी मुप्टाचे तीव्र निदर्शने

### माध्यमिक शिक्षण विभागाला निवेदन; प्रलंबित प्रश्न तात्काळ मार्गी लावण्याची मागणी : शरद मगर

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र अंडर प्रिव्हिलेज्ड टीचर्स असोसिएशन (मुप्टा) बीड जिल्हा शाखेच्या वतीने प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद बीड येथे तीव्र स्वरूपाची निदर्शने करण्यात आली. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन शिक्षण विभागाकडे सादर करून प्रलंबित प्रश्नांवर तात्काळ निर्णय घेऊन कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली.

मुप्टाच्या वतीने इयत्ता ११ वी व १२ वीच्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी सध्या असलेली ३० विद्यार्थ्यांची बॅच रद्द करून पूर्वीप्रमाणे २० विद्यार्थ्यांची बॅच कायम ठेवावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. तसेच बीड जिल्ह्यातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची थकीत वेतन देयके तातडीने निकाली काढावीत, अशी मागणी करण्यात आली. यामध्ये वैद्यकीय देयके, वरिष्ठ वेतनश्रेणी फरक, निवडश्रेणी फरक तसेच



सातवा वेतन आयोग फरक यांचा समावेश आहे. शिक्षण विभागातील वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या प्रलंबित संचिका तात्काळ मंजूर कराव्यात, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित वैयक्तिक मान्यता तसेच शालार्थ आयडीच्या शिफारस प्रस्तावांचा तातडीने निपटारा करावा, जिल्ह्यातील अतिरिक्त शिक्षकांचे त्वरीत समायोजन करावे, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली.

सन २००५ पूर्वी नियुक्त शिक्षकांची बंद करण्यात आलेली जीपीएफ खाती पूर्ववत करून नियमित कपात सुरू करावी. सातव्या वेतन आयोगातील फरकाचा पाचवा हप्ता रोखीने द्यावा. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पर्यंतची जीपीएफ खाते स्लिप वितरित करून जीपीएफ खाती ऑनलाइन करण्यात यावीत, अशी मागणी संघटनेने केली आहे. याशिवाय प्रचलित अनुदानाचा वाढीव टप्पा देण्यात यावा आणि शिक्षक-कर्मचाऱ्यांसाठी जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, या मागण्यांचाही निवेदनात समावेश आहे.


यावेळी मुप्टा बीड जिल्हाध्यक्ष शरद मगर आणि जिल्हासचिव शशिकांत जावळे यांच्या नेतृत्वाखाली संघटनेचे सर्व पदाधिकारी ज्युनियर विभाग चे जिल्हाध्यक्ष नारायण घोलप, जिल्हा सचिव प्रा.संजय बागुल, माध्यमिक विभाग जिल्हाध्यक्ष प्रवीणकुमार तरकसे, माध्यमिक विभाग जिल्हा सचिव प्राचार्य श्रीकांत वारभुवन, प्राथमिक विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रमोद साळवे, प्रवीणकुमार डावरे, उपप्राचार्य चांगण एन एस, प्रा. संजय काकडे, शेख मसूर अन्वर, अमित वाघमारे, राऊत अमोल, लेंडाळ एसडी, घोडके ए एस, घायाळ एचबी, काझी एम एस आर, पवार बी बी, चौधरी के एम, पाटील बी पी, गुरव जी एच, सोळंके जे ए, हावळे आर एन, चौरे डी पी, कुटे एस टी, राठोड पी एम, डोंगरे आर आर, खटाने बी आर, जरे ए बी, राऊत एस एस, जगताप यु एस, जोगदंड डी पी, मुंडे एन एस, मोरे सुनील, वीर एस बी, जाधव के जी, डोंगरे एस डी, शिरसट व्ही ए, बिक्कड डी आर, काळे पी आर, तांदळे एल आर, पोकळे डीबी, शेळके जे, कंधारे आर एस, सवासे ए आर, गवते एन के, जरांगे डी एस, सावंत बी व्ही, पठाण एस एन, गचांडे एस ए, शिंदे डी एस आदी प्राध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते. व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रलंबित मागण्यांवर प्रशासनाने सकारात्मक निर्णय घेऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा संघटनेच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

---

# बीडकराचा जीवाशी खेळ! नळाला येतंय सारखं गढूळ पाणी, नगरपालिकेचे दुर्लक्ष : शेख युनूस

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात बार्शी नाका, तेलगाव नाका, गांधीनगर, नाळवंडी नाका, हनुमान नगर १५ दिवसाला नळाला प्यायचं पाणी नाही तर थेट गटारातलं चिखल मिश्रित पाणी येत आहे. पाणी एवढे खराब आहे की, ते प्यायला सोडाच अंघोळीसाठी आणि कपडे धुण्यासाठी सुद्धा वापरता येते नाही. पण बीड नगरपालिकेचा पाणीपुरवठा विभाग कुंभकर्णी झोपत आहे का ? असा प्रश्न शरातील नागरिकांना पडला आहे. पण नळातून पिवळसर मातीसारखं आणि दुर्गंधीयुक्त पाणी येत आहे.




ग्लासात घेतलं की तळाशी माती दिसून येते आहे. नागरिकांनी हे पाणी पालिकेत नेऊन दाखवले तरी अधिकारी उडवा उडवी उत्तर देतात. दूषित पाण्यामुळे डॉक्टरांचे धंदे मात्र जोरात चाललेले आहे, पाण्यामुळे जुलाब उलट्या आणि कावीळ सारखे अनेक गंभीर आजार होत आहे. आणि नगरपालिका अध्यक्षांनी दूषित पुरवठा बाबत तात्काळ कारवाईचे आदेश दिले होते. पण प्रत्यक्षात कारवाई मात्र शून्य आहे. जर शहरात सुरळीत आणि स्वच्छ पाणी उपलब्ध झाले नाही तर सामाजिक कार्यकर्ता तथा पत्रकार शेख युनूस यांनी शहरांतील नागरिका सोबत आंदोलन करण्याच्या इशारा दिला आहे.

---

# भाजपने भारतीय जनतेची सहनशक्ती वाढवली की जनता नेभळट झाली?

**मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ यांनी उपस्थित केला प्रश्न**

**बीड । प्रतिनिधी**



देशात सतत वाढत चाललेल्या महागाई विरोधात विरोधी पक्षांसह जनताही उठाव करत नसल्याने सत्ताधारी भाजपने भारतीय जनतेची सहनशक्ती वाढवली की जनता नेभळट झाली? असा प्रश्न मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी उपस्थित केला आहे.

सन २०१४ पूर्वी कोणत्याही पक्षाचे सरकार असो, त्यावेळी कोणत्याही वस्तूंची नाममात्र जरी दरवाढ झाली तरी विरोधी पक्षांसह जनता सुद्धा पेटून उठायची, रस्त्यावर यायची, मोर्चे, आंदोलने, करायची. सरकारवर तुटून पडायची. २०१४ नंतर मात्र सतत वाढत असलेल्या महागाईवर ना तशी उग्रता विरोधी पक्षांकडे राहिली आहे. ना भारतीय जनता याचा कडाडून विरोध करते. पेट्रोल, डिझेल, साखर, गोडतेल, दुध, कांदे, शिक्षण, आरोग्य उपचार यात भरमसाठ वाढ होऊनही जनता निमूटपणे दरवाढीला तोंड देत आहे. आता पूर्वीप्रमाणे चुकीच्या शासन धोरणा विरोधात, महागाई विरोधात, रस्त्यावर उतरून भारतीय जनता एल्गार पुकारत नाही. यामुळे २०१४ पासून केंद्रात तसेच अनेक राज्यात सत्तेत आलेल्या भारतीय जनता पक्षाने भारतीय जनतेची सहनशक्ती वाढवली की जनता नेभळट झाली असा प्रश्न या अनुषंगाने मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी उपस्थित केला आहे.

---

# स्व. रंजनाबाई देशमुख यांच्या स्मृतीप्रित्यर्थ वृक्षारोपणातून अस्थि विसर्जन; देशमुख कुटुंबीयांचा अनोखा सामाजिक संदेश

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

परळी शहराचे माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांच्या मातोश्री, स्वर्गीय रंजनाबाई रंगनाथराव देशमुख यांचे अल्पशा आजाराने वयाच्या ८७ व्या वर्षी दि.२७ ऑगस्ट रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनानंतर तिसऱ्या दिवशी देशमुख कुटुंबीयांनी पारंपरिक विधींना पर्यावरण संवर्धनाची जोड देत एक आदर्शवत आणि सामाजिक संदेश देणारा उपक्रम राबविला.

स्व. रंजनाबाई देशमुख यांच्या स्मृतीप्रित्यर्थ शेतामध्ये वृक्षारोपण करण्यात आले. एक दोन नव्हे तर जवळपास १०१ वृक्षांचेरोपन करण्यात आल, यावेळी त्यांच्या अस्थिधातूंचे विसर्जन वृक्षारोपणाच्या माध्यमातून करण्यात आले. एका मातृवत व्यक्तिमत्त्वाच्या स्मृती कायम हिरव्यागार राहाव्यात आणि त्यांच्या स्मृतीतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचावा, या भावनेतून देशमुख कुटुंबीयांनी हा अभिनव उपक्रम राबविला.



मृत्यूनंतरही निसर्गाशी नाते जोडत, एका वृक्षाच्या रूपाने जीवनाचा संदेश पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न उपस्थितांच्या मनाला भावून गेला. एका व्यक्तीची स्मृती केवळ स्मारकातून नव्हे, तर वृक्षांच्या रूपाने जिवंत ठेवता येते, असा प्रेरणादायी संदेश या उपक्रमातून देण्यात आला. यावेळी देशमुख कुटुंबातील सर्व सदस्य, नातेवाईक तसेच परळी शहरातील प्रतिष्ठित नागरिक आणि पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनीही देशमुख कुटुंबीयांच्या या पर्यावरणपूरक आणि समाजाला दिशा देणाऱ्या उपक्रमाचे कौतुक केले. स्व. रंजनाबाई देशमुख या प्रेमळ, मनमिळावू आणि धार्मिक वृत्तीच्या व्यक्तिमत्त्वाच्या होत्या. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ करण्यात आलेल्या या वृक्षारोपणामुळे त्यांच्या जीवनमूल्यांना एक वेगळा आणि चिरंतन अर्थ प्राप्त झाला आहे. दुःखाच्या प्रसंगीही समाजाला विधायक संदेश देत पर्यावरण संवर्धनाचा संकल्प करण्याचा देशमुख कुटुंबीयांचा हा उपक्रम निश्चितच इतरांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

---

# पत्रकारांच्या प्रश्नांवर आवाज उठवणारे युवा नेतृत्व सिद्धार्थ संजय भोकरे : अनिल जायभाये बीडकर

**पुणे । प्रतिनिधी**

एकाच व्यक्तीत क्रीडा, लेखन, नेतृत्व, शिक्षण आणि संवेदनशील समाजभान, बहुआयामी महाराष्ट्रातील पत्रकारांचे नेतृत्व करत असलेले, महाराष्ट्र राज्य डिजिटल मिडिया चे प्रदेशाध्यक्ष आदरणीय सिद्धार्थ संजय भोकरे यांचा आज वाढदिवस मोठ्या उत्साहात संपुर्ण महाराष्ट्रात सामाजिक उपक्रम राबवत साजरा करण्यात आला. २७ जुलै हा दिवस केवळ एका व्यक्तीचा वाढदिवस नाही, तर तो आहे पत्रकारिता, शिक्षण, क्रीडा आणि समाजसेवा, आरोग्यसेवा यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये आपल्या कार्याचा ठसा उमटवणाऱ्या एका युवा नेतृत्वाचा उत्सव असतो.

आदरणीय सिद्धार्थ संजय भोकरे यांचा वाढदिवस दिनानिमित्त संपूर्ण महाराष्ट्रातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे, जो त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाची आणि जनमानसात त्यांनी मिळवलेल्या स्थानाची ग्वाही देतो. आदरणीय सिद्धार्थ संजय भोकरे हे नाव महाराष्ट्राच्या सामाजिक आणि व्यावसायिक वर्तुळात आता अपरिचित राहिलेले नाही. सन्माननीय संजय भोकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स, मिरज चे कार्यकारी संचालक म्हणून ते शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. याव्यतिरिक्त, 'दैनिक महानगरी' आणि 'दैनिक जनप्रवास' यांसारख्या प्रतिष्ठित दैनिकांचे ते मुख्य व्यवस्थापक आहेत, जिथे त्यांच्या दूरदृष्टीचा आणि निर्भीड पत्रकारितेचा प्रत्यय येतो. मिरज-सांगली येथील अंबाबाई तालीम संस्थेचे अध्यक्ष म्हणूनही ते सांस्कृतिक आणि सामाजिक वारसा जपण्याचे काम करतात.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश संघटक आणि समाजसेवेत अग्रेसर असणारे सन्माननीय. संजय भोकरे यांचे सुपुत्र असल्याने, समाजसेवेचे बाळकडू त्यांना घरातूनच मिळाले आहे. पत्रकारिता: सत्य आणि निर्भीडपणाचा अविष्कार आदरणीय सिद्धार्थ संजय भोकरे यांची खरी ओळख म्हणजे त्यांची पत्रकारिता. ऑल इंडिया जर्नालिस्ट असोसिएशन आणि महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे डिजिटल मीडिया राज्य अध्यक्ष म्हणून ते कार्यरत आहेत. ग्रामीण तसेच शहरी भागांतील पत्रकारांना शासनाच्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात. पत्रकारांच्या विविध समस्या सोडवण्यासाठी त्यांनी शासन स्तरावर अथक पाठपुरावा केला असून, अनेक महत्त्वपूर्ण प्रश्न मार्गी लावले आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली पत्रकार संरक्षण कायदा लागू करण्याबाबत आंदोलने झाली, पत्रकारांवरील हल्ल्यांना तातडीने वाचा फोडणारी संघटना म्हणून संघ



मजबूत झाला, आणि नव्या पत्रकारांना दिशा देणारे कार्यशिबिर, कार्यशाळा, संवाद अधिवेशने आयोजित करण्यात आली.

पत्रकार हा फक्त बातमीचा वाहक नसतो, तो समाजाचा आरसा असतो, या विश्वासावर त्यांची वाटचाल सुरू आहे. अनेकदा सत्तेच्या विरोधात उभे राहूनही सत्य मांडण्याचे धाडस त्यांनी दाखवले आहे. २०१९साली त्यांनी लिहिलेल्या एका वादग्रस्त लेखाने त्यांना जीवे मारण्याच्या धमक्या आल्या, पण त्यांनी शब्दांची तलवार म्यान केली नाही. उलट, त्या लेखाच्या समर्थनात उभे राहत त्यांनी सांगितले - माझ्या शब्दांमागे समाजाचं भलं आहे; मग त्यासाठी जोखीमही स्विकारली पाहिजे. या घटनेने त्यांना केवळ एक पत्रकार म्हणून नव्हे, तर अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या झुंजार रक्षक म्हणून एक व्यापक ओळख मिळवून दिली.

शिक्षण आणि क्रीडा क्षेत्रातील योगदान: शिक्षण क्षेत्रात, सन्माननीय संजय भोकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे उपाध्यक्ष म्हणून आदरणीय सिद्धार्थ संजय भोकरे यांनी शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी आणि विविध सामाजिक व शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी सक्रिय आहेत. युवकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी ते सदैव प्रयत्नशील असतात.

क्रीडा क्षेत्रातही त्यांनी आपला वेगळा ठसा उमटवला आहे. महाराष्ट्र फुटबॉल संघाचे उपकर्णधार म्हणून त्यांनी आपल्या संघाचे यशस्वीपणे नेतृत्व केले आहे. खेळाडू म्हणून असलेले त्यांचे कौशल्य आणि नेतृत्वाची क्षमता वाखाणण्याजोगी आहे. कला आणि मनोरंजन क्षेत्रातील सक्रियता: लहानपणापासूनच सिद्धार्थ भोकरे यांना कला क्षेत्राची आवड आहे. त्यांनी अनेक लघुपटांमध्ये अभिनय केला आहे. 'सिद्धार्थ भोकरे फिल्म्स' या स्वतःच्या प्रॉडक्शन हाऊसच्या माध्यमातून ते हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीतही सक्रिय आहेत. त्यांचे इन्स्टाग्रामवर लाखो फॉलोअर्स आहेत, जिथे ते आपल्या अभिनयाची आणि क्रीडा कारकिर्दीची झलक दाखवतात. बॉलिवूड आणि मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक कलाकारांसोबत ते नेहमीच दिसतात, जे त्यांच्या कला क्षेत्रातील सक्रियतेची साक्ष देतात.

सर्व पक्षीय राजकीय संपर्क आणि निरंतर समाजसेवेची धुरा

आदरणीय सिद्धार्थ संजय भोकरे यांचा राजकीय संपर्क खूप मोठा आहे. शरद पवार साहेबांपासून ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शिवसेना अध्यक्ष उद्धव ठाकरे अश्या अनेक मोठ्या राजकीय नेत्यांशी त्यांचे सलोख्याचे संबंध आहेत. हा संपर्क ते समाजकार्यासाठी वापरतात आणि गरजूंना मदत करण्यासाठी नेहमीच पुढाकार घेतात.

सामाजिक बांधिलकी जपताना, आदरणीय सिद्धार्थ संजय भोकरे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त आज पर्यंत महाराष्ट्रात विविध समाजोपयोगी उपक्रम राबवले आहेत. यामध्ये गरीब आणि गरजू कुटुंबांना किराणा वाटप, शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक वस्तूंचे वाटप, आणि वर्षभर शैक्षणिक साहित्याचे वाटप असे अनेक उपक्रम राबवले जातात. महाराष्ट्र राज्य डिजिटल मिडिया चे राज्य उपाध्यक्ष सन्माननीय समीर देसाई सर यांच्या पुढाकाराने अनेक सामाजिक उपक्रम वर्षभर सुरू असतात. शेती संकट, महिलांचे हक्क, आदिवासींच्या समस्या, शिक्षणातील असमतोल, आणि आरोग्यविषयक धोरणे यावर त्यांनी अभ्यासपूर्ण आणि धडाडीची मांडणी केली आहे. त्यांचे अनेक लेख ग्रामीण भागात जनजागृतीसाठी वापरले गेले आणि त्यामुळे अनेक ठिकाणी प्रश्न सोडवले गेले. यामुळे ते आज केवळ एक पत्रकार नसून, जनतेचा खरा आवाज बनले आहेत.

आपल्या वडिलांप्रमाणेच आदरणीय सिद्धार्थ संजय भोकरे यांनाही इतरांना मदत करण्याचा स्वभाव आहे. पत्रकार बंधूंवर कोणतेही संकट आले, तर ते कधीही धावून जातात. पत्रकारितेतील त्यांच्या या कार्यामुळे त्यांना अनेकदा धमक्यांना सामोरे जावे लागले, परंतु त्यांनी कधीही डगमगून न जाता आत्मविश्वासाने परिस्थितीला तोंड दिले.

आदरणीय सिद्धार्थ संजय भोकरे हे केवळ वर्तमानपत्रात छापले जाणारे नाव नाही, तर ते आहे पत्रकारितेचं एक मूल्य, एक विचारधारा, एक चळवळ. त्यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण महाराष्ट्रातील पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, आणि विचारवंत एकत्रितपणे त्यांचं योगदान स्मरण करत आहेत. सिद्धार्थ संजय भोकरे सरांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा! आपणास आरोग्य, यश, आणि अजून तेजस्वी लेखनाच्या असंख्य संधी मिळोत. तुमच्या लेखणीचा प्रकाश समाजाच्या अंधःकारात दीपस्तंभ ठरो. या वाढदिवसानिमित्त त्यांना आरोग्य सेवा विभाग, महाराष्ट्र राज्य डिजिटल मिडिया, मुंबई यांच्याकडून मनःपूर्वक शुभेच्छा!

# शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी 'सुभाष चंद्रा कर्जमाफी मॉडेल' लागू करा!

## बीड जिल्ह्यात सात महिन्यांत १२३ शेतकरी आत्महत्या; जिल्हाधिकारी कार्यालयासमोर १ सप्टेंबरला निदर्शने : डॉ. गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात शेतकरी आत्महत्यांचे सत्र सुरूच असून, १ जानेवारी ते ३१ जुलै २०२६ या सात महिन्यांच्या कालावधीत तब्बल १२३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची शासन दरबारी नोंद आहे. सततची नापिकी, ओला व कोरडा दुष्काळ, हवामानातील अनिश्चितता आणि कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकऱ्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याचे चित्र आहे. गतवर्षी २०२५ मध्ये १५१ तर २०२४ मध्ये ११३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या.



शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शासनाकडून विविध उपाययोजना केल्या जात असल्या तरी आत्महत्यांचे सत्र थांबलेले नाही. त्यामुळे आता केंद्र सरकारने उद्योगपती 'सुभाष चंद्रा यांच्या कर्जप्रकरणात करण्यात आलेल्या सेटलमेंटचा दाखला देत, त्याच धर्तीवर शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र 'सुभाष चंद्रा कर्जमाफी मॉडेल 'लागू करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

या मागणीसाठी १ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात येणार असून, जिल्हाधिकारी बीड यांच्यामार्फत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, राज्यपाल जिष्णु देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना निवेदन पाठविण्यात येणार असल्याचे डॉ. ढवळे यांनी सांगितले.

साडेसात लाख हेक्टरहून अधिक खरीप क्षेत्र; शेती पावसाच्या भरवशावर बीड जिल्ह्यात खरीपाचे क्षेत्र साडेसात लाख हेक्टरहून अधिक असून, पाण्याचे शाश्वत स्रोत उपलब्ध नसल्याने जिल्ह्यातील बहुतांश शेती आजही मान्सूनच्या पावसावर अवलंबून आहे. पेरणीपासून पीक हाती येईपर्यंत शेतकऱ्यांना अनेक संकटांना सामोरे जावे लागते. अनियमित पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ, पिकांवरील रोग-किडींचा प्रादुर्भाव आणि वाढता उत्पादन खर्च यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. शेतीत अहोरात्र कष्ट करूनही अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक तसेच मानसिक तणावाखाली जगत आहे. सततची नापिकी आणि वाढत्या कर्जाच्या चक्रव्यूहात अडकलेल्या शेतकऱ्यांसमोर कर्जफेडीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, अनेकजण आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत आहेत.



**३ वर्षांत ३८७ शेतकरी आत्महत्या**

बीड जिल्ह्यात २०२४ मध्ये ११३, २०२५ मध्ये १५१ आणि २०२६ मध्ये जानेवारी ते जुलै या सात महिन्यांत १२३, अशा एकूण ३८७ शेतकरी आत्महत्यांची शासन दरबारी नोंद झाली आहे. ही आकडेवारी शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांचा फेरआढावा घेण्याची गरज अधोरेखित करते. शेतकरी आत्महत्यांचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी केवळ आश्वासनांऐवजी शेतकऱ्यांना कर्जाच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे. केंद्र व राज्य सरकारने तातडीने शेतकऱ्यांसाठी 'सुभाष चंद्रा कर्जमाफी मॉडेल' लागू करून संपूर्ण कर्जमाफीचा निर्णय घ्यावा, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली असून, मागणीच्या समर्थनार्थ १ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात येणार असल्याचा इशारा त्यांनी प्रशासनाला दिला आहे.

# मराठवाडा वाळून चाललाय!

## पिकं करपली, पाणी संपलं, जनावरे तडफडतात तरीही सरकारला दुष्काळ दिसेना ! : शेख युनूस

**बीड । प्रतिनिधी**

मराठवाड्यात पावसाने पाठ फिरवल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.



आगस्ट महिना संपला. पावसाने दांडी मारल्याने उरले सुरले पिकही जळून गेली आहे. याला म्हणतात कोरडा दुष्काळ आणि मराठवाडा सध्या यास उंबरठ्यावर आहे.

फक्त बीड जिल्ह्यातच ४ लाख हेक्टरवर सोयाबीनची पेरणी झाली आहे. पण सलग २०-२५ दिवस पाऊस नसल्याने फुलोरा अवस्थेतील सोयाबीन जळून जात आहे. शेंगा लागत नाहीत. कापूस माना टाकू लागला, कापसाची पातगळ सुरू झाली आहे, बोंड लागत नाही. चारापाणीचे संकट आले, धरणे वाळून चालली, तलाव, विहीरी कोरड्या पडल्यात. जनावरांना चारा नाही. सरकारच्या नियमानुसार एकूण पावसात ५० टक्के पेक्षा जास्त तूट आणि सलग २१ दिवस पावसाचा खंड असेल तर दुष्काळ जाहीर करता येतं. तरीही प्रशासन केवळ पंचनामाचे नाटक करत आहे. शेतकऱ्याची एकच मागणी आहे, पिकं विमा कंपनी सर्वे करायला येत नाही. तलाठी बांधावर येत नाही, आम्हाला कर्जमाफी नको, आम्हाला कोरडा दुष्काळ जाहीर करून हेक्टरी ५० हजार मदत द्या. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार शेख युनूस यांनी सरकारकडे केली आहे.

## माजलगाव नगरपरिषदेच्या ढिसाळ कारभाराविरोधात नवीद सिद्दिकी आक्रमक

# कचरा थेट मुख्याधिकाऱ्यांच्या दारात टाकण्याचा इशारा!

**माजलगाव । शेख अखिल**

नगरपरिषदेचा निष्काळजी आणि हलगर्जी कारभार आता माजलगावचे नागरिक अजिबात सहन करणार नाहीत, असा संतप्त इशारा समाजवादी पार्टीचे माजी तालुकाध्यक्ष आणि महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार सेना संघटनेचे तालुकाध्यक्ष नवीद सिद्दिकी यांनी दिला आहे. शहरातील वाढती घाण आणि साथीचे आजार पाहता, नगरपरिषदेने तात्काळ संपूर्ण शहराची साफसफाई करून मलेरिया प्रतिबंधक औषधांची फवारणी करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असे त्यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळवले आहे.




शहरात सध्या ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले असून डासांचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. नगरपरिषदेचे कर्मचारी केवळ 'थातूरमातूर' साफसफाई करून प्रशासनाची आणि नागरिकांची दिशाभूल करत असल्याचा आरोप सिद्दिकी यांनी केला आहे.

**नवीद सिद्दिकी यांनी प्रशासनाला दिलेल्या मुख्य मागण्या आणि इशारा**

तात्काळ संपूर्ण स्वच्छता: शहरातील प्रत्येक गल्ली आणि मुख्य रस्त्यांची तात्काळ झाडू मारून पूर्ण साफसफाई करण्यात यावी. औषध फवारणी: मलेरिया, डेंग्यू यांसारख्या जीवघेण्या आजारांना अटकाव करण्यासाठी संपूर्ण माजलगाव शहरात मलेरिया नाशक औषधांची फवारणी करावी. दोषींवर गुन्हे दाखल करा: ज्या 'हरामखोर' आणि कामचोर कर्मचाऱ्यांनी किंवा कंत्राटदारांनी थातूरमातूर साफसफाई करून जनतेच्या पैशांची उधळपट्टी केली आहे, त्यांच्यावर तात्काळ गुन्हे दाखल करण्यात यावेत.

**अंतिम इशारा**

जर नगरपरिषदेने या मागण्यांकडे दुर्लक्ष केले, तर शहरातील संपूर्ण कचरा उचलून थेट माजलगाव नगरपरिषदेच्या कार्यालयात आणून टाकणार, असा थेट आणि आक्रमक इशारा नवीद सिद्दिकी यांनी दिला आहे. या आंदोलनाला माजलगावमधील सर्वसामान्य नागरिक आणि बांधकाम कामगारांचा मोठा पाठिंबा असून, प्रशासनाने वेळीच जागे व्हावे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# नाथरा येथे माजी मंत्री धनंजय मुंडे यांची शिष्टमंडळाने घेतली भेट



**माजलगाव । शेख अखिल**

नाथरा येथील फार्म हाऊसवर शनिवार, दि. २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता माजी मंत्री धनंजय मुंडे यांची लुखेगाव येथील शिष्टमंडळाने प्रत्यक्ष भेट घेतली. यावेळी सेवा सहकारी सोसायटी संचालक तथा ग्रामपंचायत सदस्य, लुखेगावचे संचालक वाजेद पठाण, लुखेगाव येथील डॉ. तोफिक पठाण, युवा नेते आदिल पठाण, सलीम शेख तसेच सय्यद जलील साहब यांची उपस्थिती होती.

या भेटीदरम्यान लुखेगाव परिसरातील विविध सामाजिक व विकासात्मक विषयांसह पुढील राजकीय दिशा आणि आगामी कार्याबाबत चर्चा झाल्याची माहिती आहे. शिष्टमंडळाच्या पुढील कार्याला माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी शुभेच्छा दिल्या. या भेटीमुळे लुखेगाव परिसरातील आगामी राजकीय घडामोडींना वेग येण्याची शक्यता असून, स्थानिक पातळीवर या भेटीकडे राजकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण म्हणून पाहिले जात आहे.

# बीड शहरातील भटक्या कुत्र्यांचा तात्काळ बंदोबस्त करा

## अन्यथा कुत्रे नगरपालिकेत सोडणार; प्रेम कांबळे यांचा इशारा
## 'पीपल फॉर ॲनिमल' एजन्सीला काळ्या यादीत टाकून गुन्हा दाखल करण्याची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील विविध भागांमध्ये भटक्या कुत्र्यांचा वावर दिवसेंदिवस वाढत असून, नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. लहान मुले, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच दुचाकीस्वारांना भटक्या कुत्र्यांचा त्रास सहन करावा लागत आहे. कुत्र्यांच्या हल्ल्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बीड शहरातील गल्लीबोळात तसेच मुख्य रस्त्यावर कुत्र्याचे टोळके फिरताना दिसत आहे यामुळे नागरिकात भीतीचे वातावरण पसरले आहे.

मागील महिन्यात धानोरा रोड परिसरात लहान बालकावर कुत्र्यांच्या टोळक्याने हल्ला केल्याची घटना घडली होती. ही घटना ताजी असतानाच दोन दिवसांपूर्वी धांडे नगर परिसरात घरासमोरील रस्त्यावर खेळत असलेल्या दोन वर्षीय चिमुकलीवर भटक्या कुत्र्याने हल्ला केला. या हल्ल्यात कुत्र्याने चिमुकलीच्या तोंडावर आणि



मानेवर चावा घेतला. शेजाऱ्यांनी वेळीच धाव घेत कुत्र्याला हुसकावून लावल्याने पुढील अनर्थ टळला.

या गंभीर समस्येची दखल घेत दलित पँथर युवक जिल्हाध्यक्ष प्रेम धर्मेंद्र कांबळे यांनी बीड नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देऊन शहरातील भटक्या कुत्र्यांचा तात्काळ बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे. भटक्या कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी नियुक्त करण्यात आलेल्या 'पीपल फॉर निमल' एजन्सीच्या कामकाजाची चौकशी करण्याची मागणीही कांबळे यांनी केली आहे. संबंधित एजन्सीने प्रत्यक्ष काम न करता बिले उचलली असल्याचे चौकशीत आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करून एजन्सीला काळ्या यादीत टाकावे. तसेच अचानक काम बंद करून एजन्सी गायब झाली असल्यास, आर्थिक गैरव्यवहार अथवा करारभंग आढळून आल्यास नियमानुसार गुन्हा दाखल करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

नागरिकांच्या जीविताची सुरक्षितता ही नगरपालिकेची प्राथमिक जबाबदारी आहे. भटक्या कुत्र्यांचा तात्काळ बंदोबस्त करण्यात आला नाही, तर नागरिकांच्या प्रश्नासाठी संविधानिक मार्गाने आंदोलन उभारले जाईल. प्रशासनाने ठोस कारवाई न केल्यास कुत्रे नगरपालिकेत आणून सोडण्यात येतील, असा इशारा प्रेम कांबळे यांनी दिला आहे. शहरातील वाढता भटक्या कुत्र्यांचा उपद्रव आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेता, नगरपालिका प्रशासन आता कोणती ठोस उपाययोजना करते, याकडे बीडकरांचे लक्ष लागले आहे. हवे असल्यास यासाठी अधिक आक्रमक हेडलाईन, दोन उपशीर्षके आणि सोशल मीडियासाठी छोटी पोस्टही तयार करून देऊ शकतो.

# पेठ बीड पोलिसांनी रक्तदान करून जपली सामाजिक बांधिलकी

## कंकालेश्वर मंदिरातील रक्तदान शिबिरात अधिकारी, कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**भाविकांच्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा चोख बंदोबस्त**

**बीड । प्रतिनिधी**

श्रावणातील तिसरा सोमवार आणि चतुर्थीचा योग आल्याने बीड शहरातील विविध शिवालयांमध्ये भाविकांची मोठी गर्दी झाली होती. पहाटेपासूनच भाविकांनी मंदिरांमध्ये दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. या पार्श्वभूमीवर कंकालेश्वर मंदिर परिसरात आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कंकालेश्वर मंदिर येथे आयोजित रक्तदान शिबिरात बीड शहरातील तरुणांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत रक्तदान केले. यावेळी पेठ बीड पोलीस ठाण्याचे अधिकारी व



कर्मचाऱ्यांनीही रक्तदान करत सामाजिक बांधिलकी जपली. पोलिसांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

दरम्यान, श्रावण सोमवारनिमित्त कंकालेश्वर मंदिरात सकाळपासूनच भाविकांची मोठी गर्दी होती. गर्दीच्या पार्श्वभूमीवर पोलीस निरीक्षक निलेश केळे यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळपासूनच मंदिर परिसरात चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. भाविकांना दर्शन घेताना कोणताही त्रास होऊ नये, तसेच वाहतूक व कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिसांनी विशेष खबरदारी घेतली.

रक्तदान शिबिरात पोलीस निरीक्षक निलेश केळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक शशिकांत मुसळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रितमकुमार पुजारी, पोलीस उपनिरीक्षक साईनाथ बारगळ, सुभाष मोटे, विलास ठोंबरे, विष्णू गुजर, परजने यांच्यासह एलसीबीचे राहुल शिंदे, सय्यद अश्फाक आदींनी रक्तदान केले. पोलिसांनी केवळ कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी न बजावता रक्तदानासारख्या सामाजिक उपक्रमात सहभागी होत समाजाप्रती असलेली आपली बांधिलकीही जपल्याचे यावेळी दिसून आले.

# शफीक भाऊ, तुम्ही लोकांची हृदये काबीज केली ओ!

ॲड. शेख शफीक भाऊ हे नाव ऐकताच किंवा उच्चारताच डोळ्यांसमोर उभी राहते ती एक बुटक्या चणीची हडकुडी व्यक्ती. शारीरिक उंची अत्यंत सामान्य तर शरीर प्रकृती ही अगदीच सडपातळ मात्र समाजातील प्रत्येक जाती धर्माच्या लोकांसाठी मनात ठासून भरलेली मानवता, प्रत्येकाच्या सुखदुःखात धावून जाणारे अशी ओळख असलेले ड. शेख शफ़ीक़ भाऊ हे सध्या बीड शहरासह संपूर्ण जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरले आहे. काल दिनांक ३० ऑगस्ट २०२६ रविवार रोजी शफ़ीक़ भाऊंच्या मातोश्री शेख ज़ाहिदा सालेह मुहम्मद यांचे वयाच्या ७६ व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांची नमाज़-ए-जनाज़ा रात्री ११:०० वाजता तकिया मस्जिद येथे पठण करण्यात आली. त्यानंतर दफनविधी तकिया कब्रस्तान येथे करण्यात आला.

तत्पूर्वी गेल्या काही दिवसांपासून ज़ाहिदा बेगम यांची प्रकृती अत्यंत खालावल्याने त्यांना बीड शहरातील काकू-नाना रुग्णालय येथे भरती करण्यात आले होते. दवाखान्यात भरती केल्यापासून ते त्यांची प्राणज्योत मालवे पर्यंत प्रत्येक दिवशी दिवस-रात्र अक्षरशः शेकडो तरुण रुग्णालयात उपस्थित राहत होते. रात्र-रात्र जागून काढत होते. यामागे त्यांच्या मनात होते ते शफ़ीक़ भाऊंविषयी असलेले आदर आणि प्रेम.

शफ़ीक़ भाऊंनी विद्यार्थी दशेपासूनच सामाजिक चळवळ आणि सर्वसामान्य तळागाळातील लोकांसाठी सदैव सामाजिक कार्याला प्राधान्य देऊन वाहून घेतलेले आहे. यामुळेच ते फक्त विद्यार्थी, तरुण यांच्यासाठीच नाहीतर आबाल वृद्धापर्यंत आदरणीय व्यक्तीमत्व म्हणून ओळखले जातात. म्हणूनच त्यांच्या आईंना रुग्णालयात दाखल केल्यानंतर तिथे तरुणांची सारखी रेलचेल होती.

३० ऑगस्ट रविवार रोजी रुग्णालयात त्यांचे निधन होताच ही वार्ता अगदी वाऱ्यासारखी बीड शहरासह संपूर्ण जिल्हाभरात पसरली आणि पाहता पाहता लोकांचे जत्थे च्या जत्थे ज्यात तरुणांसह प्रत्येक वयोगटातील लोकांचा भरणा होता जिल्हाभरातून शेकडोंच्या संख्येने रुग्णालयात पोहोचले. रुग्णालयातून पार्थिवशरीर त्यांच्या घरी हलविल्यानंतर सुभाष रोड, दत्त मंदिर गल्ली, चुन गल्ली, बडी राज गल्ली अक्षरशः लोकांनी भरून गेले. आलेला प्रत्येक जण भाऊंना वैयक्तिक भेटून धीर देत होता.

भाऊंच्या घरून रात्री १०:०० वाजता निघणाऱ्या आईच्या जनाज़्याला खांदा देण्यासाठी हजारोंचा जनसमुदाय जमला होता. चुन गल्लीपासून निघालेला जनाज़ा सराफा गल्ली, धोंडीपुरा, बलभीम चौक, कारंजा टॉवर, अजिज़पुरा मार्गे तकिया मस्जिद येथे १०:४५ वाजता पोहोचला. मस्जिद मधील जनाज़ा नमाज़साठी असलेले सभागृह तुडुंब भरून गेले नंतर सभागृहाबाहेरील सहन जागा सुद्धा पुरली नाही म्हणून नमाज़-ए-जनाज़ासाठी आलेल्या अनेकांना गुलज़ारपुराच्या रस्त्यावर उभे राहून नमाज़ अदा करावी लागली. एवढ्या मोठ्या संख्येने हजारो लोक नमाज़-ए-जनाज़ा आणि दफ़नविधीसाठी हजर होते. लोकांकडून असा आदर आणि प्रेम मिळविणे सहज सोपे नाही. यामागे मोठ्या परिश्रमाचा वाटा असतो आणि ते शफ़ीक़ भाऊंनी घेतलेले आहे. म्हणूनच त्यांनी लोकांकडून आदर आणि प्रेम मिळविलेले आहे.

**कोण आहेत शफ़ीक़ भाऊ!**

शफिक भाऊंच्या मातोश्रींच्या निधनानंतर हजारोंचा जनसमुदाय पाहून अनेकांच्या मनात नक्कीच प्रश्न आला असेल की एवढी लोकमान्यता मिळविणारा व्यक्ती आहे तरी कोण? नाही म्हणजे शफ़ीक़ भाऊंना ओळखत नाही असा एकही व्यक्ती बीड शहरच काय संपूर्ण बीड जिल्ह्यात सुद्धा नसेल. तर हा प्रश्न शफ़ीक़ भाऊ मंत्री, खासदार, आमदार, नगराध्यक्ष एवढेच काय नगरसेवक सुद्धा कधी राहिलेले नाही. मग त्यांच्यावर प्रेम करून आदर करणारा एवढा जनसमुदाय त्यांनी कसा मिळविला



हा मुख्य मुद्दा आहे.

तर यामागे आहे तो त्यांचा सर्व समावेशक दृष्टिकोन. प्रत्येकाचे सुखदुःख काहीही असो माहिती होताच धावून जाणारे शफिक भाऊ. समोर हिंदू, मुस्लिम, सिख, ईसाई, दलित किंवा अन्य कोणत्याही जाती धर्मातील व्यक्ती असो, प्रत्येकाला आपले मानणारे. प्रत्येकाच्या सुखदुःखाची आस्थेवाईकपणे विचारपूस करणारे. प्रत्येकाच्या अडीअडचणीत पुढे होणारे, असे विरळे व्यक्तिमत्व म्हणजेच शफ़ीक़ भाऊ.

यामुळेच शफ़ीक़ भाऊंच्या मातोश्रींची नमाज़-ए-जनाज़ा जिथे हजारो मुस्लिम बांधव मस्जिदसह रस्त्यांवर उभे राहून पठण करीत होते, त्याचवेळी मुस्लिमेत्तर शेकडो बांधव नमाज़ पूर्ण होईपर्यंत स्तब्ध उभे होते. यात सर्वसामान्यांसह अनेक गणमान्य व्यक्तींचाही समावेश होता. मग ते समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती असो की, राजकीय क्षेत्रातील. प्रत्येक जण आपल्या या लाडक्या शफ़ीक़ भाऊंच्या मातोश्रींना शेवटचा निरोप देण्यासाठी आणि शफ़ीक़ भाऊंना धीर देण्यासाठी जातीने उपस्थित होता.

**भविष्यात शफ़ीक़ भाऊ गोपीनाथराव मुंडे होऊ शकतील का?**

शफ़ीक़ भाऊ ९०% समाजकारण आणि फक्त १०% राजकारण करणारे म्हणून ओळखले जातात. या बळावरच त्यांनी प्रत्येक जाती-धर्मांतील लोकांच्या हृदयात आपले एक विशिष्ट असे स्थान निर्माण केलेले आहे. समाजात वावरताना आपण पाहतो की, राजकारण असो की समाजकारण सर्वसमावेशक दृष्टिकोन करणारे काही मोजकेच लोक असतात. यात बीड जिल्ह्यापुरता जरी विचार केला तरी दिवंगत गोपीनाथराव मुंडे साहेब यांचं स्थान एकमेवाद्वितीय होते. त्यांच्या सर्वसमावेशक दृष्टिकोनामुळेच ते जरी तहयात भारतीय जनता पक्षात कार्यरत राहिले होते तरीही त्यांनी कधीच कोणत्याही जाती-धर्मात भेदाभेद केला नाही. म्हणूनच त्यांना सर्वमान्य नेते म्हणून तहहयात ओळखले गेले. त्यांच्या निधनानंतर अनेक वर्षे उलटूनही आजही ते प्रत्येक जाती-धर्माच्या लोकांमध्ये आदरणीय व्यक्तिमत्त्व म्हणून विराजमान आहेत.

अशाच प्रकारे शफ़ीक़ भाऊ सुद्धा सदैव सर्वसमावेशक दृष्टिकोन ठेवून चालणारे आणि वागणारे म्हणून ओळखले जातात. गोपीनाथराव मुंडे नेहमी भाजपकडून निवडणूक लढवायचे आणि मोठ्या मताधिक्याने निवडून यायचे. ज्यात इतर समाजासह मुस्लिम समाजाचीही एक गठ्ठा मते त्यांना मिळायची. याची जाण सुद्धा त्यांना होती म्हणूनच पंतप्रधान पदावर विराजमान असलेल्या नरेंद्र मोदींसारख्या पक्षाच्या वरिष्ठ नेत्यालाही त्यांनी निवडणूक काळात प्रचार करण्यासाठी बीड जिल्ह्यात येण्यापासून रोखले होते. ही बाब लक्षात घेता गोपीनाथराव मुंडे यांचा दृष्टिकोन सर्व समाजांसाठी किती व्यापक होता हे सहज लक्षात येते.

असाच दृष्टिकोन शफ़ीक़ भाऊंचा सुद्धा आहे. मात्र ते ज्या एआयएमआयएम पक्षाचे जिल्हाध्यक्ष आहेत, त्या पक्षाला फक्त मुस्लिमांचा पक्ष म्हणून पाहिले जाते. जसे भाजपला कट्टर हिंदुत्ववादी म्हणून पाहिले जाते. असे असले तरी गोपीनाथराव मुंडे सारख्या व्यक्तीकडे पाहून मुस्लिम समाज नेहमी त्यांना एक गठ्ठा मतदान करीत असे. त्यांना निवडून आणण्यात मोठा हातभार लावत असे. असेच मोठेपण पुढे चालून शफ़ीक़ भाऊ जर आमदारकी किंवा खासदारकीची निवडणूक लढू लागले तर मुस्लिमेत्तर समाज दाखवेल का?

कारण मुस्लिम समाजाने गोपीनाथराव मुंडे साठी भाजप सारख्या पक्षाकडे दुर्लक्ष करून त्यांना आपले नेते मानले व नेहमी मतदान रुपी सहकार्य केले. असेच मतदान रुपी सहकार्य शफ़ीक़ भाऊंसाठी भविष्यात मुस्लिमेत्तर समाजाकडून मिळू शकेल काय? आणि ते भविष्यात गोपीनाथराव मुंडे साहेबांसारखे राजकारणात सर्व समावेशक नेते होऊ शकतील का? असे प्रश्न त्यांच्या मातोश्रींच्या निधनात जमलेल्या मुस्लिम बांधवांच्या हजारों आणि मुस्लिमेत्तर बांधवांच्या शेकडोंच्या उपस्थितीमुळे अनायासे मनात उभे राहिले आहे.

कारण ते सुद्धा विद्यार्थी दशेपासूनच अनेक वर्षे गोपीनाथराव मुंडे यांचे मार्गदर्शन व नेतृत्वाखाली भाजपमध्ये कार्यरत राहिल्याने त्यांची जडणघडण सुद्धा मुंडे साहेबांसारखीच झालेली आहे. म्हणूनच त्यांनाही म्हणावेसे वाटते - शफ़ीक़ भाऊ, तुम्ही लोकांची हृदये काबीज केली ओ!

**लेखन - एस.एम.युसूफ़**
**(मुक्त पत्रकार) आसेफ़नगर,**
**बीड. संपर्क - ९०२१०२३१२१**

साप्ताहिक, विश्वनायक हे पत्र, प्रकाशक, मालक, संपादक, **शेख बिलाल शेख युसूफ** यांनी मुद्रक, जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै, जि.बीड महाराष्ट्र -४३११२२ येथे छापून साप्ताहिक विश्वनायक कार्यालय, घर क्रं.१/१०/६६ खासबाग, खाजानगर, तुळजाभवानी मंदिर जवळ, ता,जि, बीड, महाराष्ट्र -४३११२२ येथे प्रकाशित केले, **(साप्ताहिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही. *वाद विवाद जिल्हा न्यायालया अंतर्गत)** मो. 8686888898
ई-मेल- vishvanayak94@gmail.com

The weekly newspaper, Vishvanayak, is published by its publisher, owner, and editor, Sheikh Bilal Sheikh Yusuf. It is printed at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vaijnath, Taluka Parli Vaijnath, District Beed, Maharashtra - 431122, and published from the Vishvanayak Weekly office, House no,1/10/66,Khasbag, Khajanagar, near Tuljabhavani Temple, Taluka & District Beed, Maharashtra - 431122. (The editor may not necessarily agree with the content and news in the weekly publication.*Disputes are subject to the jurisdiction of the district court) Mobile: 8686888898 - Email: vishvanayak94@gmail.com